नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक १३ * * अमरावती * रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात

### न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याची तयारी सुरू



■ **नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना हटविण्यासाठी संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी केंद्र सरकारने सुरू केली आहे. यासाठी लोकसभा खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जात आहेत.

हा प्रस्ताव लोकसभेत आणता येईल. लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी किमान १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात. तर राज्यसभेत ही संख्या ५० खासदारांची आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आधीच सांगितले आहे की, २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याचा प्रस्ताव आणला जाईल.

### रोहित पवारांविरोधात ईडीने दाखल केले आरोपपत्र



■ **मुंबई :** आमदार रोहित पवार यांच्याविरोधात मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. यावर रोहित पवार यांनी आपल्या एक्स वरून एक ट्वीट करत ईडीच्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी आहेत. त्यांनी फक्त आलेल्या आदेशाचे पालन केले आणि आता आरोपपत्रही दाखल केले आहे. सत्यमेव जयते,जय संविधान असे ट्विट करताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे म्हटले आहे.

### बांगलादेशात अर्थशास्त्रज्ञ अबुल बरकत यांना अटक



**ढाका :** शुक्रवारी भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणात प्रसिद्ध बांगलादेशी अर्थशास्त्रज्ञ अबुल बरकत यांना तुरुंगात पाठवण्यात आले. ढाका ट्रिब्यूनच्या वृत्तानुसार, २० हून अधिक पोलिसांनी बरकत यांच्या घरावर छापा टाकला. त्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले.

अबुल बरकतवर त्यांच्या कार्यकाळात रेडिमेड गारमेंट कंपनी 'ॲनोनटेक्स ग्रुप' ला बेकायदेशीर मार्गाने कर्ज मिळविण्यात मदत केल्याचा आणि जनता बँकेतून २.९७ अब्ज टका (सुमारे २२५ कोटी रुपये) गबन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात अबुल बरकतसह एकूण २३ जणांना आरोपी करण्यात आले आहे, ज्यात बांगलादेश बँकेचे माजी गव्हर्नर अतिउर रहमान यांचा समावेश आहे.

# जगभरातून पर्यटक येणार

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**
युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिल्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे.

युनेस्कोच्या या निर्णयामुळे शिवरायाचे १२ किल्ले जागतिक पटलावर आलेत. या निर्णयामुमळे पर्यटनाला चालना तर मिळेलच, पण सोबतच महाराजांचा गौरवशाली इतिहासही वैश्विक पातळीवर नेण्यासाठी आपल्याला फायदा होणार आहे, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात फडणवीस यांनी युनेस्कोने शिवरायांच्या १२ किल्ल्यांना दिलेल्या जागतिक वारसा स्थळाच्या दर्जावर समाधान व्यक्त केले.

ते म्हणाले, सर्वप्रथम जगभरातील शिवप्रेमींचे मी अभिनंदन करतो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले हे जागतिक वारसा स्थळ म्हणजे वर्ल्ड हेरिटेज साईट घोषित करण्यासाठी नॉमिनेट केले होते. मोदींकडे देशभरातील ७ वेगवेगळ्या साईट्स गेल्या होत्या. या साईट्सना जागतिक वारसा स्थळ घोषित करण्याची शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने पंतप्रधानांकडे केली होती. पण मोदींनी शिवरायांच्या १२ गडकिल्ल्यांना प्राधान्य दिले.

किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी व जिंजी या १२ किल्ल्यांना आता जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला आहे. १२ पैकी ११ किल्ले महाराष्ट्रात आहेत, तर . जिंजी हा तामिळनाडूमध्ये आहे.

या किल्ल्यांचे वेस्टर्न घाट, समुद्र, जंगल आदी नैसर्गिक विविधतेत कसे स्थापत्य तयार करण्यात आले. त्याच्या जागा शोधण्यात आल्या. कशाप्रकारे दरवाजे तयार करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी माची कशा तयार करण्यात आल्या. अशा सर्वच गोष्टी आपण युनेस्कोपुढे ठेवल्या. त्यानंतर युनेस्कोच्या शिष्टमंडळाने भारतात येऊन सर्वच किल्ल्यांना भेट दिली.

आपले एक शिष्टमंडळ युनेस्कोत पाठवले. त्यांनी तिथे टेक्निकल प्रझेंटेशन केले. त्यानंतर मतदानाचा अधिकार असणारे सर्वच देशांच्या राजदुतांशी आम्ही चर्चा केली. मी व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. त्यानंतर त्या त्या देशातील राजदुतांना त्या त्या देशातील सरकारांशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर काल वीसही देशांनी आपल्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झाले. त्यामुळे शिवप्रेमींचा हा एक मोठा विजय आहे.

या निर्णयामुळे पर्यटनाला चालना मिळेल, महाराजांचा गौरवशाली इतिहास वैश्विक करण्यासाठी व वैश्विक पर्यटक आकृष्ट करण्यासाठी फायदा होईल, असे ते म्हणाले.

#### शिवरायांचा इतिहास वैश्विक पातळीवर

फडणवीस पुढे म्हणाले, मतदान करणाऱ्या सर्वच देशांनी शिवरायांनी बांधलेल्या या किल्ल्यांचे कौतुक केले. अनेक लोक हे किल्ले बांधताना किती पुढचा विचार करण्यात आला होता हे पाहून आश्चर्यचकितही झाले होते. आता हे किल्ले जागतिक वारसा स्थळ झाल्यामुळे आपले महाराजांचे किल्ले वर्ल्ड मॅपवर आलेत. युनेस्कोच्या सगळ्या वेबसाईट्सवर या किल्ल्यांची सर्वच ऐतिहासिक माहिती उपलब्ध होईल. वर्ल्ड टूरिझम मॅपवर हे किल्ले येणार आहेत. युनेस्कोच्या माध्यमातूनही त्या किल्ल्यांच्या ठिकाणी जागतिक वारसा स्थळ म्हणून सगळी माहिती असणाऱ्या कियॉस्क उभे राहणार आहे.

# तरुणांचे कौशल्य हे भविष्यातील सर्वात मोठे भांडवल

### रोजगार मेळावा : ५१ हजार रोजगार पत्रांचे वाटप



■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १२ :**
पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी १६ व्या रोजगार मेळाव्यात ५१ हजारांहून अधिक तरुणांना नोकरी पत्रे वाटली.

त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सांगितले की, तरुणांची क्षमता ही आपल्या भारताच्या भविष्याचे सर्वात मोठे भांडवल आणि हमी आहे. आमचे सरकार या भांडवलाला समृद्धीचे स्त्रोत बनवण्यात गुंतलेले आहे.

ते म्हणाले की, मी दोन दिवसांपूर्वीच ५ देशांच्या दौऱ्यावरून परतलो आहे. भारताच्या युवाशक्तीचा आवाज प्रत्येक देशात ऐकू येत होता. या काळात जे काही करार झाले आहेत, त्यांचा फायदा युवकांना नक्कीच होईल. तुमचे विभाग वेगळे आहेत पण ध्येय एकच आहे. काम काहीही असो, पद कोणतेही असो, क्षेत्र कोणतेही असो, ध्येय राष्ट्रीय सेवा आहे. एकमेव ध्येय म्हणजे नागरी सेवा.

देशभरात ४७ ठिकाणी रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. आतापर्यंत ९.७३ लाखांहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. आज आपला देश जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे. हा आपल्या देशातील तरुणांचा पराक्रम आहे, असेही पीएम मोदी यावेळी म्हणाले.

### अहमदाबाद विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल जाहीर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** एअर इंडियाच्या फ्लाइट एआय-१७१ चा प्राथमिक तपास अहवाल आला आहे. विमान अपघात तपास ब्युरोने १२ जुलै रोजी १५ पानांचा अहवाल सार्वजनिक केला.

सुरुवातीच्या निकालांवरून असे दिसून आले आहे की, जेटच्या दोन्ही इंजिनमधील इंधन प्रवाह नियंत्रित करणारे स्विच निकामी झाले होते, ज्यामुळे टेकऑफनंतर काही वेळातच इंजिन बंद पडले आणि विमानाचा जोर कमी झाला. पायलटने ते पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. अहवालात असेही उघड झाले आहे की उड्डाणापूर्वी, एका फ्लाइट सेन्सरमध्ये समस्या होती, जी दुरुस्त करण्यात आली होती.

# जयंत पाटील यांच्या राजीनाम्यावरून संभ्रम



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त अनेक समाज माध्यमांवर झळकले आहे.

त्यांच्या जागी पक्षाने शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. ते येत्या १५ जुलै रोजी जयंत पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारतील अशी माहिती आहे.

दुसरीकडे, याच पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जयंत पाटील यांच्या राजीनाम्याचे वृत्त फेटाळून लावले आहे. तर आमदार रोहित पवार यांनी पक्षात बदलाला सुरूवात झाल्याचे म्हटले आहे. यामुळे जयंत पाटील यांच्या राजीनाम्याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे.

#### जयंत पाटील हेच प्रदेशाध्यक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त पूर्णतः खोडसाळपणाचे असल्याचा दावा आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. जयंत पाटील हे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या प्रसारीत होणे, हा निव्वळ खोडसाळपणा आहे, पक्ष एका नियमानुसार आणि शिस्तीनुसारच चालत असतो, असे आव्हाड यांनी म्हटले आहे.

#### जयंत पाटील भाजपमध्ये जाणार नाहीत

राजीनामा दिला म्हणून जयंत पाटील भाजपमध्ये जातील असे नाही, कारण आतापर्यंत ते साहेबांसोबत राहिले आहेत. सत्तेसाठी ते जाणार नाहीत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दिली. वरिष्ठ नेत्यांनी ठरवले आहे, आता बदल व्हायला पाहिजे त्याची सुरुवात झाली आहे, असेही रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# गुणवत्तेला प्रोत्साहन देणारी ठरेल ॲग्रोव्हिजनची नूतन वास्तू!

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ :**
शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी, आधुनिक कृषी तंत्रज्ञान त्यांच्यायंत पोहोचविण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी १७ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या ॲग्रोव्हिजनला शेतकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे, त्यांना प्रशिक्षण मिळावे आणि जागतिक दर्जाच्या कृषी विषयक चर्चा घडवून याव्यात यासाठी निर्माण होणारी ॲग्रोव्हिजनची भव्य वास्तू म्हणजे समाजातील गुणवत्तेला प्रोत्साहन आणि कृषी ज्ञान संकुल असणार आहे असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले.



केंद्रीय मंत्री गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास : ॲग्रोव्हिजन फार्मर्स मार्केटचे भूमिपूजन

वर्धा मार्गावर हॉटेल रेडिसनच्या शेजारी ॲग्रोव्हिजन फार्मर्स मार्केटचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर, मार्गदर्शन व ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, ॲडव्हान्टेज विदर्भचे सचिव डॉ. विजय शर्मा, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे राजू मिश्रा, बाळासाहेब कुळकर्णी, स्व. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे सचिव प्रशांत बोपर्डीकर, माजी खासदार डॉ. विकास महात्मे प्रामुख्याने उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, भविष्यातील हे फार्मर्स मार्केट आणि कम्युनिटी सेंटर फक्त एक इमारत नाही, तर विदर्भाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने उभारलेली भविष्याची पायाभरणी आहे. ही इमारत केवळ भौतिक वास्तू न राहता, शेती, संशोधन, संस्कृती आणि समाजासाठी एक प्रेरणास्थान ठरेल.

#### सर्व कार्यालये एकत्र

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट, स्व. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, खासदार क्रीडा महोत्सव समिती, आदी संस्थांचे कार्यालय या एकाच इमारतीत राहणार आहेत. ही इमारत नागपूर विभागात एक नवा मानदंड ठरवेल असेही ते म्हणाले.



# संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस

## संजय शिरसाट यांची माहिती



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस बजावण्याचा इशारा दिला आहे. गत काही दिवसांपासून संजय राऊत मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी माझी माफी मागितली नाही, तर मी त्यांना मानहाणीची नोटीस बजावेल. तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल करेन, असे ते म्हणालेत. संजय राऊत यांनी स्वप्ना पाटकर यांच्याविषयी काय - काय बोलले होते, त्याचा व्हिडिओ पाहिला, तर आपल्याला त्यांची लायकी कळेल, असेही ते यावेळी म्हणाले. मंत्री संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, संजय राऊत यांनी जर माफी मागितली नाही तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. ते राज्यघटना मानत नाहीत. ते पुन्हा सांगतील अशा अनेक नोटीस आम्ही खिशात घेऊन फिरतो.

# राज्यातील प्रत्येक शेताला रस्त्यासाठी समग्र योजना आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उपायोजनांसाठी समितीची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेचा उत्तरात केली.

शेतरस्त्यांच्या बाबत सदस्य अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुमित वानखेडे यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५- १५ योजनेतील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

या सूचनेच्या उत्तरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. वाटप पत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता कमीत कमी १२ फूट रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येईल. शेतरस्ते निर्मितीबाबत रोजगार हमी योजना, ग्रामविकास व महसूल विभाग यांच्याशी चर्चा करून स्वतंत्र लेखा शीर्ष निर्माण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. कालबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते पूर्ण करण्यात येतील, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा : पंकजा मुंडे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ :



पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी सांगितले, पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे.

मंत्री मुंडे यांनी सांगितले, या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल.

राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही.

याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी /पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# लिपिक-टंकलेखक पदाच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार : आशिष शेलार



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या लिपिक आणि टंकलेखक पदासाठी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात दाखल झालेल्या याचिकेची सुनावणी मा. उच्च न्यायालयात ९ जुलै २०२५ रोजी घेण्यात आली आहे. मा. न्यायालयाने हा निकाल राखून ठेवला असून मा. उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त होताच या परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल, असे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात मंत्री अॅड. शेलार यांनी ही माहिती दिली. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे करिअर व हित लक्षात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोग भरती परीक्षेत चांगले काम करत असल्याचे सांगत मंत्री अॅड. शेलार म्हणाले, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये मुलाखतीपर्यंत पात्र ठरलेल्या मात्र निवड न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' हा उपक्रम जाहीर केला आहे.

# शिळफाटा रस्त्यावर कोळे गाव येथे जलवाहिनी फुटून घरांमध्ये पाणी

■ महासागर प्रतिनिधी, कल्याण, दि. १२ :

कल्याण शिळफाटा रस्त्यावर काटई - बदलापूर रस्त्यावरील कोळे गाव हद्दीत समाधान हॉटेल भागात शुक्रवारी रात्री बारा वाजता एमआयडीसीची उच्च दाबाची जलवाहिनी फुटली. जलवाहिनीतून उच्च दाबाने शेकटो लीटर पाणी बाहेर फेकले गेल्याने हे पाणी जलवाहिनी परिसरातील कोळे गावांमधील घरांमध्ये घुसले.

बारवी धरणाकडून जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातून आलेल्या नवी मुंबई, ठाणे, मुंब्रा, कळवा, डोंबिवली परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या काटई बदलापूर मार्गाने काटई कोळे गाव हद्दीतून शिळफाटा चौकमार्गे नवी मुंबई, मुंब्रा दिशेने टाकण्यात आल्या आहेत. या जलवाहिनीवरील कोळे गाव हद्दीतील समाधान हॉटेल भागातील जलवाहिनीच्या एका वाहिकेला पाण्याच्या अति उच्च दाब प्रवाहामुळे शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास गळती लागली. या गळतीचे प्रमाण वाढुन जलवाहिनी वाहिका अति दाबामुळे फुटली. जलवाहिनीतील वेगवान प्रवाहाने वाहणारे पाणी मध्यरात्रीच्या सुमारास परिसरातील घरांमध्ये घुसले. या भागातील रस्ते जलमय झाले.

मुसळधार पावसामुळे महापूर येऊन घरात पाणी घुसले की काय या भीतीने घरात जमिनीवर झोपलेले रहिवासी जागे झाले. दरवाजा उघडल्यानंतर त्यांना घर परिसरातील रस्ते, बोळ जलमय झाल्याचे दिसले. मुसळधार पाऊस नसताना अचानक इतके पाणी आले कोठुन असे



प्रश्न कोळेगावातील रहिवाशांना पडले. कोळेगावातील बहुतांशी रहिवासी घरात पाणी घुसल्याने जागे झाले. त्यांनी विजेऱ्या घेऊन परिसरात पाहणी केली. त्यांना एमआयडीसीची काटई बदलापूर रस्त्यावरील कोळेगाव जवळील समाधान हॉटेलजवळील जलवाहिनी फुटली असल्याचे निदर्शनास आले.

ग्रामस्थांनी ही माहिती तात्काळ एमआयडीसीच्या वरिष्ठांना दिली. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने या जलवाहिनीतून जांभूळ उदंचन केंद्र (बारवी धरण) भागातून येणारा पाणी पुरवठा बंद केला. एमआयडीसीची जलवाहिनी दुरूस्त करणारे तांत्रिक पथक आणि एमआयडीसीचे स्थानिक अधिकारी मध्यरात्री घटनास्थळी दाखल झाले. फुटलेल्या जलवाहिनीतील पाण्याची पातळी कमी होताच, त्यांनी नादुरुस्त जलवाहिनीचा भाग काढून टाकला. त्या ठिकाणी नवीन भाग जोडून पहाटेपर्यंत या जलवाहिनीवरील पाणी पुरवठा पूर्ववत केला.

# धक्का लागल्याच्या वादातून हत्या

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :

धक्का लागल्याच्या वादातून टोळक्याने एकाला दांडक्याने बेदम मारहाण करुन त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना हडपसर-सासवड रस्त्यावरील ऊरळी देवाची परिसरात घडली. याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. टोळक्याने केलेल्या मारहाणीत दोघे जण जखमी झाले असून, या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता.

रामलोचन हुसेनी कोरी (वय ४६, रा. उत्तरप्रदेश) असे खून झालेल्याचे नाव आहे. टोळक्याने केलेल्या मारहाणीत धीरज राम (वय २५) संतकुमार कोरी (वय २५, रा. ऊरूळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता, फुरसंगी) हा जखमी झाला आहे. याप्रकरणी प्रेमलाल सुरतनाम कुमरे (वय २१), देवेस वसंत धुर्वे (वय २२), संजय पुल्स मसराम (वय २८), रणजीत प्रकाश जाधव (वय २०), सतीश भरत कुमरे (वय १८), विशाल मनाजी सरियाम (वय १८) यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत संतकुमार कोरी (वय २५, सध्या रा. नारंग ट्रान्सपोर्ट, ऊरळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता)

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतकुमार आणि रामलोचन हे मामा भाचे आहेत. रामलोचन, संतकुमार, धीरज हे मूळचे उत्तरप्रदेशातील आहेत. आरोपी हे मध्यप्रदेशातील आहेत. ऊरळी कांचन परिसरातील गोदामात ते हमाली करतात. आरोपीं आणि संतकुमार, रामलोचन यांच्यात एकमेकांकडे पाहण्यावरुन वाद झाला होता.

# बेशिस्त वागणारा माझा नातलग असला तरी त्याला टायरमध्ये घाला

## अजित पवारांची पोलिसांना सूचना



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १२ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेशिस्त वर्तन करणाऱ्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. बेशिस्त वागणारा माणूस कितीही मोठ्या बापाचा असला तरी मी पोलिसांना त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. नियम सर्वांसाठी समान आहेत. मग तो अजित पवार असो किवा अजित पवारांचा कुणी नातलग असो, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी बारामती येथील सावित्री हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी हुल्लडबाजी करणाऱ्यांना उपरोक्त शब्दांत इशारा दिला. ते म्हणाले, कधी कधी दुचाकीवाले इकडे-तिकडे पाहतात आणि हळूच राँग साईडने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करतात. असा माणूस सापडला तर तो मुलगा किंवा व्यक्ती कितीही मोठ्या बापाचा असला तरी, मी त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. त्याला त्याच्या 10 पिढ्या आठवल्या पाहिजेत. कुणीही अजिबात नियम तोडू नका. मग तो अजित पवार असो की अजित पवाराचा नातलग असो. सवार्ना नियम सारखा आहे.

अजित पवार पुढे म्हणाले, मी जे करतो ते बारामतीकरांसह सर्वांसाठी करतो. मी अनेक ठिकाणी झाडे लावली. पण तिथे कुणीपण येत आहे. जनावरे चरत आहेत. पण तसे चालणार नाही. जिथे माणसांना बसण्यासाठी जागा केली आहे, तिथे एक दुचाकीस्वार निवांत मांडी घालून लोकांसोबत गप्पा मारत होता. मी गाडी वळवली व पोलिसांना सांगितले की, याची गाडी ताब्यात घे आणि याला चांगला टायरमध्ये घाल. मग त्याने चुकले म्हणून विनवणी केली.

# गरिबांच्या हडप केलेल्या जागा त्यांना परत मिळवून देण्यासाठी मोहीम : चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई :** गरिबांच्या जागा धाकदपट करून, जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून हडप केल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. संपूर्ण राज्यात अशा जागांची तपासणी करून गरिबांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल, अशी घोषणा विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या संदर्भात सदस्य असलम शेख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री योगेश सागर, अबू आझमी यांनीही सहभाग घेतला. प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, कल्याण तालुक्यातील मौजे गोळवली येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली. या जागेवर ७२ सदनिका, ८ व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम करण्यात आले. याबाबत तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. या इमारतीमध्ये सदनिका व गाळे घेणाऱ्या नागरिकांचा कुठलाही दोष नाही.

# ते दोघेही मुंबईच्या हिताचाच निर्णय घेतील



**मुंबई :** राज व उद्धव ठाकरे यांच्या विजयी मेळाव्यानंतर हे दोघे भाऊ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढतील असा दावा केला जात आहे. याविषयी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. तर राज या प्रकरणी सावध पाऊले टाकताना दिसून येत आहेत. पण आता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या एका विधानामुळे राज ठाकरे आपल्या भावाला हात दाखवत भाजपसोबत जाणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. रवींद्र चव्हाण शनिवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, राजकारणाक केव्हा काय होईल हे सांगता येत नाही.

ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा झाला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी राज ठाकरे यांनी स्टेटमेंट दिले होते की, कार्यकर्त्यांनी युतीच्या संदर्भात काहीही बोलू नये. चर्चा करू नये. त्यामुळे प्रत्येक पक्ष व प्रत्येक संघटना आगामी निवडणुकांच्या दिशेने अत्यंत सावधपणे पाऊले टाकत असल्याचे स्पष्ट होते. राज ठाकरे हे अतिशय समजदार आहेत. त्यांचे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे हे दोघेही मुंबईच्या दृष्टिकोनातून जे जनतेचे हित आहे, त्यानुसारच पाऊले उचलतील. रवींद्र चव्हाण यांच्या या विधानामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे भाजपसोबत जाणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

# वाळूज एमआयडीसीत कामगाराचा अमानुष मारहाणीनंतर खून

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. १२ :

शहरातील वाळूज एमआयडीसी परिसरात आज (12 जुलै) सकाळी एक धक्कादायक आणि मन हेलावणारी घटना समोर आली आहे. अंबेलोहळ (गट क्र. 37) येथे 23 वर्षीय अर्जुन रतन प्रधान या तरुण कामगाराचा अमानुष मारहाण करून खून करण्यात आला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अर्जुन प्रधान हा वाळूज एमआयडीसीतील एका खासगी कंपनीत काम करत होता. कालच त्याचा पगार झाला होता. आज सकाळी अर्जुनचा सावत्र भाऊ रामकृष्ण याला तो रस्त्याच्या कडेला अर्धनग्न अवस्थेत, गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. तातडीने पोलिसांना कळवण्यात आले. वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

मृतदेह पाहताच अर्जुनच्या आईने हंबरडा फोडला. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक तपासात, अर्जुनला कपडे काढून अमानुषपणे मारहाण करण्यात आली असून, यामधूनच त्याचा मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मारहाण कोणत्या कारणातून आणि नेमकी कोणी केली? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, अर्जुनचा कालच पगार झाल्याची माहिती आणि त्याच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी पोलिस करत आहेत.

# जनसुरक्षा नव्हे, भाजपचा दडपशाहीचा कायदा

## शोषितांचा आवाज दाबण्यासाठी प्रयत्न : संजय राऊतांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

जनसुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आम्ही त्याला विरोध करत राहू. दलित, शोषित पीडित यांचा आवाज उठवणाऱ्या संघटना, त्यांना समर्थन देणारे सामाजिक कार्यकर्ते त्यांना व्यसन घालून कारागृहात पाठवण्यासाठी हे जन सुरक्षा विधेयक आणले आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, जिथे फडणवीसांचे सरकार पोहचत नाही संघ पोहचत नाही तिथे संघटना पोहचतात ही यांची खरी पोटदुखी आहे. राज्यात जवळपास अशा 70 च्या आसपास संघटना कार्यरत आहे. त्यांच्यावर शहरी नक्षलवादी म्हणून कार्यवाही



करण्यासाठी हा कायदा आणला आहे, असा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, आणीबाणीच्या काळात मिसा कायदा आणला गेला होता. त्यामुळे आणीबाणी बदनाम झाली होती. मिसा कायद्याच्या अंतर्गत ज्यांना अटक करण्यात आली ते लोक गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते. त्यानंतर ताडा आला, त्यात छोट्या-छोट्या गुन्ह्यांमध्ये ताडा लावत राजकीय पदाधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्यात आले. आता जन सुरक्षा कायदा आणला. तुमचे सरकार आज आहे उद्या नाही. जनतेच्या सुरक्षेचा ठेका तुम्ही घेतलेला नाही. जन सुरक्षेमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांवर अशा प्रकारे बंदी आणणे असा होत नाही. अनेक सामाजिक संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, बहुमताच्या जोरावर तुम्ही कायदा मुजूर केला असला तरी विरोधी पक्षातील आम्ही सर्व या कायद्याला विरोध करु. उद्धव ठाकरे यांनी काल स्पष्ट केले आहे की हा जन सुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आजही आदिवासी पाड्यांवर रुग्णालय नाहीत. गरोदर महिलांना झोळीतून रुग्णालयात नेतांना त्यांचे मृत्यू झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या विदभार्तील आणि एकनाथ शिंदेंच्या ठाण्यातील चित्र अतिशय खराब आहे.

संजय राऊत म्हणाले की, माझ्यावर कारवाई का करण्यात येईल? त्यांनी मला प्रबोधन केले तर चांगले होईल. आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आला. मी तो प्रसिद्ध करण्यापूर्वी मीडियामध्ये आला. त्या व्हिडिओमध्ये राज्यातील मंत्री पैशाच्या बॅगेसह दिसून येत आहे. तुम्ही जन सुरक्षा कायदा आणला आहे ना, मी जनहितासाठी जर हा व्हिडिओ पुढे आणला असेल तर कुणाचा बेअब्रू होण्याचे कारण नाही. त्यांनी त्यावर खुलासा दिला आहे. व्हिडिओ मी काढला नाही, त्यांच्या घरातील हा व्हिडिओ आहे.

# आषाढीनिमित्त एसटीच्या ५,२०० जादा गाड्या

## तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविकांनी केला प्रवास

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरला जाण्यासाठी ठिकठिकाणांहून तब्बल ५,२०० जादा बसगाड्या सोडल्या. त्यामुळे एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळाले. त्याचबरोबर या जादा बसगाड्यांमधून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक झ्र प्रवाशांना पंढरपुरला पोहोचणे सुकर झाले, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण राज्यातून पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक-प्रवाशी जातात. या भाविक-



प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने तब्बल ५ हजार २०० जादा बस सोडल्या होत्या. ३ ते १० जुलै दरम्यान या बसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली. यातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले.

मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ते ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त आहे. आषाढी यात्रेनिमित्त २०२४ मध्ये सोडलेल्या जादा बसगाड्यांमुळे एसटीला २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये उत्पन्न मिळाले होते. एसटीला आर्थिक फायदा करून देणारे, तसेच लाखो भाविकांना पंढरपुरला सुखरुप ने-आण करणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक, अधिकारी अभिनंदन पात्र आहेत, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले. आषाढी यात्रेच्या काळामध्ये पंढरपूरमध्ये येणाऱ्या एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांची जेवणाअभावी गैरसोय होऊ नये, म्हणून प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चातून ५, ६ व ७ जुलै रोजी मोफत जेवण, चहा-नाश्त्याची सोय केली होती. याचा फायदा हजारो एसटी कर्मचाऱ्यांनी घेतला. याबद्दल सर्व एसटी कर्मचाऱ्यांनी सरनाईक यांचे आभार मानले.

# परीक्षा घोळ टाळण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

राज्याबाहेरील एमएचटी-सीईटी परीक्षा केंद्रांवरील गंभीर त्रुटींमुळे या केंद्रांना आता पूर्णतः बंद करण्यात येत असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. तसेच परीक्षेतील चुका टाळण्यासाठी कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली सातसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीचा कार्यभाग व्यापक असून प्रश्नसंच तयार करणाऱ्या तज्ज्ञांची निवड, प्रश्नसंचानुसार प्रश्नपत्रिका तयार करण्याची कार्यपद्धती निश्चित करणे यांचा त्यात समावेश आहे. परीक्षेतील तांत्रिक चुकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊन फेरपरीक्षा घ्यावी लागल्याने ही समिती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.

सदस्य अभिजित वंजारी यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. मागील काही वर्षांत राज्यात पेपरफुटीची ८९ प्रकरणे घडली आहेत. सात सदस्यीय किंवा तत्समच्या परीक्षा टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्यातर्फे घेतल्या जातात. त्यात मोठ्या प्रमाणात घोळ होतो. यात टीसीएसचे कर्मचारी आणि केंद्रप्रमुखांचे साटेलोटे असते, असा आरोपही अभिजित वंजारी यांनी केला.

पाटणा येथील एका केंद्रावर ४ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळाले होते, जे अत्यंत संशयास्पद मानले गेले. यामुळेच महाराष्ट्राबाहेरील केंद्रांना आता संपूर्णतः बंद करण्यात येत असल्याचे मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले. एमएचटी-सीईटीसह सर्व केंद्रपूर्व परीक्षा आणि स्पर्धा परीक्षा केवळ महाराष्ट्रातील पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंग महाविद्यालयांमध्येच घेतल्या जाणार आहेत. खासगी संस्थांच्या केंद्रांवर गैरप्रकार आढळल्याने अशा संस्थांना काळ्या यादीत टाकण्याबाबतही सरकार सकारात्मक असल्याचे संकेतही दिले.

सुमारे ६.७७ लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या एमएचटी-सीईटी परीक्षेत मराठी व उर्दू भाषांमध्ये २१ त्रुटी आढळल्या होत्या. इंग्रजी प्रश्नपत्रिकेतदेखील २१ प्रकारच्या त्रुटी नोंदवण्यात आल्या. त्यामुळे ५ मे २०२५ रोजी काही विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा घेण्यात आली. या प्रकरणात जबाबदार तीन सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा खुलासा असमाधानकारक ठरल्याने त्यांना गोपनीय परीक्षा कामावरून हटवण्यात आले आहे असे पाटील यांनी सांगितले.



# आमदार निवासातील धिंगाणा

**स्टेटलाईन**

**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासस्थानातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीच्या घटनेवरून सर्वसामान्य माणूसही चक्रावून गेलाय. अरेरे काय हे? असे हे झालेच कसे?

मुंबईत राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना सत्ताधारी पक्षाचा आमदार आपल्याला नित्कृष्ठ दर्जाचे जेवण मिळाले म्हणून कमालीचा संतप्त होतो व कमरेला टॉवेल व अंगात बनियन अशा वस्त्रानिशी उपहारगृहात जाऊन तेथील कर्मचाऱ्याला ठोसे लगावतो, याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाले.

त्या आमदार महोदयांना मिडियातून वारेमाप प्रसिध्दी मिळाली म्हणून ते कदाचित खूश झाले असतील पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या आमदाराचे कान उपटले आहेत. अशा बेजबाबदार वर्तनाने आमदारांची प्रतिष्ठा कलंकित होते असे त्यांनी म्हटले आहे. एवढेच नव्हे तर आमदार संजय गायकवाड हे ज्या शिवसेना पक्षाचे आहेत, त्या पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्या आमदारांच्या गैरकृत्याचे समर्थन करता येणार नाही असे म्हटले आहे.

सर्व मिडियातून आमदार निवासातील उपहारगृहात झालेल्या मारहाणीच्या घटनेची छी थू झाली आहे. यात सत्ताधारी पक्षाच्या म्हणजेच महायुतीच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहेच पण त्या आमदारावर तत्काळ कोणातीच कारवाई न झाल्याने सरकार त्याला का संरक्षण देते आहे, असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

जेवण खराब मिळाले किंवा उपहारगहात वारंवार खराब जेवण मिळते म्हणून आमदाराने तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करणे योग्य आहे का? आमदार म्हणजे विधिमंडळाचा सदस्य असतो. मतदारांनी त्याला निवडून दिले आहे. ज्या विधिमंडळाला कायदे करण्याचा अधिकार आहे, त्या सभागृहचे सदस्य स्वतःच कायदा हाती घेत असतील तर त्यांच्यावर तत्काळ गुन्हा का दाखल झाला नाही?

आपण कायदे मंडळाचे सदस्य आहोत, याचे भान आमदार संजय गायकवाड यांना नसावे का? आमदार म्हणून सदस्याला विशेषाधिकार मिळतात. त्याचा कुठेही अवमान झाला किंवा त्याला कमी महत्व दिले गेले तरी ज्याने कोणी अवमान केला किंवा ज्याने कोणी त्यांची बदनामी केली त्याच्या विरोधात विशेष हक्कभंग आणला जातो, त्याची विधिमंडळाच्या विशेष हक्क समितीकडून चौकशी होते व त्या समितीला शिक्षा देण्याचा सुध्दा अधिकार कायद्याने दिला आहे.

ज्याला आमदार म्हणून विशेषाधिकार आहेत, तोच जर कायदा हातात घेऊन रागाच्या भरात कोणाला मारहाण करीत असेल तर त्याच्यावर काय कारवाई करावी हे आता विधानसभा अध्यक्ष व विधान परिषदेच्या सभापतींनी ठरवायचे आहे.

आमदाराने आमदार निवासातील उपहारगृहातील कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीच्या घटनेनंतर सरकारची काहीच जबाबदारी नाही काय? सरकार व सत्ताधारी पक्ष म्हणून त्या आमदारावर तत्काळ कोणतीच कारवाई का होऊ नये? मारहाणीच्या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाला जाग आल हेही नसे थोडके.

या विभागाच्या अधिकाऱ्यांनी डाळ, भात व इतर अन्नाचे नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. आमदार निवासातील उपहारगृहात रोज शेकडो लोक जेवणखाण करतात. तिथले दर कमी किवा वाजवी असतात. एकशे चाळीस रूपयात राइस प्लेट मिळते. त्यात दोन चपात्या, डाळ, भात, दोन भाज्या, दही, पापड तसेच स्वीट डिश म्हणून खीरही मिळते. तसेच नाष्टा म्हणून मिळणारे पदार्थही वाजवी दरात असतात.

आमदार निवासातील उपहारगृहात परवडणाऱ्या दरात नाष्टा व जेवणखाण मिळते म्हणून मंत्रालय व आजुबाजुच्या सरकारी व खाजगी कार्यालयातील नोकरदार व कामासाठी येणारे लोक तिथेच जेवण करतात. विशेष म्हणजे उपहागृहाचे व्यवस्थापन गेली तीन दशके एकाच कंत्राटदाराकडे आहे. व्यवस्थापकही वर्षानुवर्षे तोच आहे.

या काळात राज्य सरकारच्या अन्न व औषध प्रशासनाने किती वेळा धाडी टाकल्या, किती वेळा तेथील अन्न पदार्थांची तपासणी केली. आपण चार वेळा तरी निकृष्ठ अन्नाविषयी तक्रार केल्याचे मारहाण करणारे आमदार सांगत आहेत.

त्याची माहिती विधिमंडळाच्या उपहारगृह समितीकडे किंवा अन्न व औषध प्रशासनाकडे पोचली नाही का? कोणत्याही सार्वजनिक कामांची कंत्राटे कशी दिली जातात, याची नेहमीच उघडपणे चर्चा होते मग तीन दशके एकच कंत्राटदार राज्यात कोणाचेही सरकार असले तरी त्यांना सोयीचा ठरतो हेच त्या मागचे गुपित आहे का?

जेव्हा जेवण नित्कृष्ठ म्हणून आमदार उहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण करतात मग रस्ते निकृष्ठ बनवले जातात, नवीन उड्डाण पुलांना तडे जातात किंवा खड्डे पडतात, पाणी पुरवठा अपुरा किंवा अस्वच्छ असतो, तेव्हा सर्वसामान्य जनतेने काय करावे? खते किंवा बियाणे शेतकऱ्यांना निकृष्ठ दिली जातात तेव्हा त्यांनी कुठे धावत जायचे?

आश्रम शाळांतील मुलांना किंवा अंगणवाडीत आहार जेव्हा नित्कृष्ठ दिला जातो तेव्हा त्या बालकांनी कुठे आक्रोश करायचा ? आज सरकारी शाळांतून मुलांना नित्कृष्ठ शिक्षण दिले जाते, शिक्षणाचा दर्जा घसरलाय अशी रोज ओरड ऐकायला मिळते मग पालकांनी कुणाकडे कसा संताप प्रकट करायचा ?

संजय गायकवाड हे दोन वेळा बुलढाण्यातून आमदार म्हणून निवडून आलेत. ते कपाळावर गंध लावतात, त्यांच्या गळ्यात रूद्राक्षाच्या माळाही असतात, स्वतःला कट्टर हिंदू धार्मिक समजणारे असे का वागतात? निकृष्ठ जेवण मिळाले म्हणून त्यांचा तोल ढळलाच कसा?

उपहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली, त्याबद्दल आमदार महोदयांना पश्चाताप नाही किंवा आपली चूक झाली असे वाटत नाही. हेच संजय गायकवाड यापुर्वी अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत एका मुलाखतीत भारतातील आरक्षण पध्दतीवर भाष्य केले तेव्हा याच आमदारांनी राहुल गांधी याची जिभ छाटणाऱ्यास ११ लाखाचे इनाम जाहीर केले होते.

काही वर्षापुर्वी जंगलात आपण वाघ मारला असून त्याचा दात आपल्या गळ्यातील माळेत असल्याचा दावा केला होता, त्यावर वन विभागाने त्यांच्यावर गुन्हा नोंदवला होता. त्यांची मोटार एक पोलीस धूत असल्याचा व्हिडिओ मध्यंतरी व्हायरल झाला होता. महाराष्ट्रातील पोलिसांची बदनामी होईल असेही त्यांनी एकदा आक्षेपार्ह भाष्य केले होते.

लोकांनी निवडून दिले म्हणून मुजोरपणाने वागणे किंवा कायदा हातात घेऊन मारहाण करणे इथपर्यंत यांची मजल कशी जाते? आपल्या नेत्यांना काय वाटेल, याचे त्यांना भय राहिले नाही का? पक्ष नेतृत्वाचा आमदारांना धाक राहिलेला नाही का?.

विधिमंडळातील संख्या बळाच्या स्पर्धेत पक्ष नेतेही आमदारांच्या बेताल वर्तनावर नियंत्रण ठेऊ शकत नाहीत हेच चित्र आमदार निवासातील घटनेनंतर महाराष्ट्राला दिसले. विधानसभेत अध्यक्षांच्या समोरील राजदंड पळवला किंवा त्याला हात लावला तरी शिक्षा होते, गोंधळ घालून सतत कामकाज बंद पाडले तरी निलंबन होते, मग आमदार निवासात असभ्य व असंस्कृत वर्तन करणाऱ्या आमदारावर तत्काळ कारवाई का झाली नाही? अध्यक्ष व सभापती यांच्यावर कारवाईचा निर्णय ढकलून सरकारने काय साधले? पहिलीपासून हिंदी सक्तिच्या निर्णयानंतर सत्तापक्षाच्या आमदाराच्या धिंगाण्याने सरकारच्या प्रतिमेला आणखी एक धक्का बसला आहे.

# परिस्थितीला दोष देण्यापेक्षा हिंमतीने मात करा

आजकाल प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हिंमतीने जीवन जगण्यापेक्षा व यशाला काबीज करण्यापेक्षा परिस्थितीला दोष देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सध्या समाजात खूप वाढली आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी किंवा चांगल्या कॉलेजला प्रवेश घेण्यासाठी बहुतांश विद्यार्थी आपली आर्थिक परिस्थिती तेवढी सक्षम नाही म्हणून परिस्थितीला दोष देत अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी बसले आहेत.

आहे त्या परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर करायचा सोडून, परिस्थितीला दोष देणे हा आपला वैयक्तिक कमीपणा ठरू शकतो. आपल्यात त्या परिस्थितीचा सामना करण्याची हिंमत व धाडस नाही, असेच म्हणावे लागेल.

अशा मुलांना जर एखाद्याने विचारले, बाबा तू अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी का बसलास? तुला पुढील उच्च शिक्षण शिकू वाटत नाही का? तेव्हा ती मुले म्हणतात की, अहो काका माझी उच्च शिक्षण शिकायची व मोठ्या पदावर रुजू व्हायची खूप इच्छा आहे, पण माझी आर्थिक परिस्थिती हालाखीची व कमकुवत असल्यामुळे मी पुढील उच्च शिक्षण घेऊ शकत नाही.

माझे आईवडील गरीब आहेत. शेतात काबाडकष्ट करून कसाबसा घर प्रपंच चालवतात. आणि माज्या शिक्षणाला पैसा पुरवतात. मला उच्च शिक्षण शिकवण्यासाठी ते आता कुठवर पैसा पुरवतील? आणि मी तरी कुठवर त्यांच्या जीवावर शिक्षण शिकू? असे बोलून ते मोकळे होतात.

असे बोलणे त्या मुलाचे कदाचित खरे आहे. पण परिस्थितीला दोष देणे त्या मुलाचे अनुचित आहे. शिक्षण शिकण्यासाठी माणसाला परिस्थिती कधीच आड येत नाही. माणूसच परिस्थितीला घाबरून माघार घेतो आणि परिस्थितीला दोष देत बसतो.

बहुतांश विद्यार्थी म्हणतात की, आई-वडिलांची परिस्थिती मला शिकवण्या एवढी सक्षम नाही, म्हणून मी शिक्षण शिकायचे थांबवले आहे. पण विद्यार्थ्यांच्या मनात असे का येत नाही की, आपण काम करत करत शिकून यश मिळवले पाहिजे.

कष्ट करून स्वतःच्या जीवावर शिक्षण घेऊन यश मिळवणारे व मोठ्या पदावर रुजू होणारे या जगात खूप लोक आहेत. त्यांनी परिस्थितीला कधीच दोषी ठरवले नाही. त्यांच्यात काम करून शिकण्याची धमक होती. म्हणून ते यशस्वी झाले. तुमच्यात काम करून शिकायची धमक नाही म्हणून तुम्ही परिस्थितीला दोषी ठरवत आहात.

श्रीमंत घरातील मुले कधीच यशस्वी होऊन मोठ्या पदावर रुजू होत नाहीत. ज्यांना आई-वडिलांच्या कष्टाची व गरिबीची जाणीव आहे, आई-वडिलांचा जीवन संघर्ष ज्ञात आहे, तीच मुले प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाचे उंच शिखर गाठतात. स्वतःच स्वतःच्या जीवनाला घडवतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिकणारी गरीब घरातील होतकरू मुलेच कोणत्याही परीक्षेत श्रीमंत मुलांच्या पुढे असतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिशय गरीब घरातून मोठ्या उंचीवर पोहोचलेलं एक जबरदस्त व्यक्तिमत्व तरुणांसाठी प्रेरणास्थान व आदर्श आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर परिस्थितीला दोष देत बसले असते, तर कधीच आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते व भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार झालेच नसते.

डॉ.बाबासाहेबांएवढी बिकट परिस्थिती हल्ली आमच्या कोणत्याच युवकाची नाही, बाबासाहेबांना शिक्षण शिकत असताना किती आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले? जातीयतेचे किती विखारी चटके सहन करावे लागले? बाबासाहेबांमुळेच आज आपल्याला यशाचा मार्ग सोपा व सुखकर झाला आहे. तरीपण आजकालची मुले परिस्थितीला दोष देऊन शिक्षणाला रामराम ठोकत आहेत.

मेंढपाळ कुटुंबातील बिरदेव डोने हा मुलगा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आयपीएस अधिकारी झाला आहे. तो युवकांसाठी आदर्श व दीपस्तंभ ठरला आहे. त्याची प्रेरणा आमच्या युवकांनी घेऊन प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाला काबीज केले पाहिजे.

आपल्या देशात असे कितीतरी महात्मे होऊन गेले आहेत, की त्यांनी परिस्थितीला दोष न देता, प्रतिकूल परिस्थितीवर हिंमतीने मात करून यशाला गवसणी घातली आहे. या महापुरुषांचा जीवन संघर्ष व त्यांचा जीवन प्रवास आपण पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञात करावा आणि परिस्थितीला न दोष देता, तिच्यापुढे न डगमगता हिंमतीने तिचा सामना करावा...आणि यशाला आपल्याकडे खेचून घ्यावे.

कारण परिस्थितीच आपल्याला घडवत असते...परिस्थितीची जाणीव ठेवून आपण खूप खूप अभ्यास केला पाहिजे... आई-वडिलांवर तेवढे अवलंबून न राहता स्वतःच्या जीवावर कष्ट करून शिकले पाहिजे... कारण जो मनुष्य स्वतःच्या हिमतीवर, कष्ट करून शिकतो आणि परिस्थितीला झुकवून मोठ्या उंचीवर पोहोचतो, त्याची इतिहास सुद्धा नोंद घेतो...हे लक्षात असू द्या...

----------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी. ता. अहमदपूर जि. लातूर**
**मो.7498715661**

■ ■ ■

# ऐश्वर्या रॉय (बच्चन) या अभिनेत्रीच्या केसमध्ये कोर्टाने काय महत्वपूर्ण निकाल दिला?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




नेहमीच्या स्वरुपात आपण सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात सोन्याबद्दलची नवीन माहिती बघणार आहोत.

**प्रश्न** – दरवर्षी सोन्याच्या किंमतीत वाढ होत राहते, तर या वाढीव किंमतीवर इन्कमटॅक्स लागतो का?

■ या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉय केसमध्ये जावे लागेल. ऐश्वर्या के. रॉय विरुद्ध डेप्युटी कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स (2007) 104 ITD 166 (मुंबई ट्रिब्यु) या प्रसिद्ध केसमध्ये जेव्हा इन्कमटॅक्सवाल्यांनी धाड टाकली तेव्हा ऐश्वर्या रॉयकडे हिऱ्यांचे दाग-दागिने सापडले, त्यावेळेस इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी त्याची किंमत काढून इन्कमटॅक्स लावला.

कारण तिच्याकडे हिऱ्याचे पदक (लटकन), चैन आणि हिऱ्याचे सोन्यात गाठलेले टॉप सापडले. ते सर्व इन्कमटॅक्समध्ये दाखवलेले होते. तरी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी वाढलेल्या भावावर फरक काढून इन्कमटॅक्स लावले, तथा ऐश्वर्या रॉय यांना टॅक्स भरण्यास सांगितले.

इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने खरेदी किंमत न जुमानता वाढीव किमतीवर इन्कमटॅक्स भरण्यास सांगितले. ही अभिनेत्रीने वर अपील केले आणि तिच्या बाजूने कोटार्चा निकाल लागून त्यांना वाढीव भावातील टॅक्स भरण्यास सूट देण्यात आली. येथे इन्कमटॅक्स विभाग हारला.

सोप्याभाषेत असे म्हणता येईल की खरेदी किंमतच इन्कमटॅक्समध्ये धरली जाईल. वाढीव किमतीवर इन्कमटॅक्स लावला जाणार नाही.

**प्रश्न** – ऐश्वर्या के. रॉय या केसमध्ये मुंबई हायकोर्टाने काय निकाल दिला?

■ या साठी आपल्याला थोडी केसची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. सर्चच्या वेळेस धाडीमध्ये ऐश्वर्या रॉयकडे 42,02,978/- रुपयांची त्यावेळी ज्वेलरी सापडली. ऐश्वर्यांना ही ज्वेलरी कशी व कुठून आणली याचे सविस्तर उत्तर मागितले. त्यांनी त्याचे उत्तरही दिले.

परंतु, इन्कमटॅक्सवाल्यांना ते मान्य झाले नाही व त्यांनी 19,89,628 इतक्या रकमेच्या दागिन्यावर इन्कमटॅक्स लावले. रीतसर ही केस बॉम्बे हायकोर्टात गेली. तेथे कोर्टाने कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सचे म्हणणे मान्य केले नाही व ऐश्वर्या रॉय यांच्या बाजूने निर्णय दिला. तथा अधिकाचा लावलेला टॅक्स रद्द केला.

पुढील लेखामध्ये आपण आणखी अशीच सोन्याबद्दलची नवीन माहिती जाणून घेणार आहोत. त्यात त्यांना अरेस्ट करण्याचे अधिकार आहेत का?.

ज्या वाचकांना काही प्रश्न किंवा सुचना असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉटस्ॲप करावे, यांची उत्तरे याच पेपर च्या पुढील लेखमालेत निःशुल्क देण्यात येतील, ही नम्र सुचना.

■ ■ ■

# ऑनलाइन जुगारच्या विळख्यात युवापिढी



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे.

आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत.

ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे.

ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा.

केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे.

ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत.

ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत.

या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले.

न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

■ ■ ■

# लाडकी बहीन योजनेवर टीका म्हणजे उलटा चोर कोतवाल को डांटे..

**वाचक लिहितात**

राज्यातील लाडकी बहीन योजना सुरु झाल्यापासून विरोधकांकडून सातत्याने टीका सुरू आहे. मात्र सरकारच्या या उपक्रमाला मिळणारा जनसमर्थन पाहता विरोधकांची ही भूमिका म्हणजे उल्टा चोर कोतवाल को डांटे अशी म्हण आठवते, असे मत आनंदबाबू कदम यांनी व्यक्त केले आहे.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महायुती सरकारने राबवलेली लाडकी बहीन योजना आणि इतर कल्याणकारी योजनांना विरोधकांकडून हेतुपुरस्सर प्रश्नचिन्ह लावले जात आहे.

खात्यांमध्ये पैसे जमा होण्यास सुरुवात होताच, विरोधकांनी योजना बंद होणार, पैसे कुठून येणार? इतर योजनांचे पैसे वापरले जातात, असे आरोप करू लागले आहेत. कदम पुढे म्हणाले की, ज्यांचे ९० टक्के खासदार व आमदार कोट्यधीश आहेत, ते स्वतः मात्र सरकारकडून भरघोस वेतन, भत्ते, निवास सुविधा, वाहन, हवाई प्रवास, टेलिफोन व इतर अनेक सुविधांचा लाभ घेतात. इतकेच नव्हे, तर कार्यकाळानंतर पेंशनही घेतात.

हेच लोक जर सरकारकडून मिळणाऱ्या सर्व लाभांचा त्याग करतील, तर लाडकी बहीन योजनेसाठी भरपूर निधी उपलब्ध होऊ शकतो, असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, ही योजना गरीब, होतकरू महिलांसाठी संजीवनी ठरत असून, समाजात सकारात्मक बदल घडवत आहे. त्यामुळे अशा योजनांना राजकीय रंग देणे दुर्दैवी आहे.

■ **आनंदबाबू कदम**
**दत्तवाडी, नागपूर. ९८६०२०८७३७**

# तुम्ही देखील फ्रीजमधून बाहेर काढलेले अन्न खात असाल तर... सावधान



आपण रात्री उरलेलं अन्न हे खराब होऊ नये म्हणून ते फ्रिजमध्ये ठेवतो. प्रत्येक घरात असचं चित्र पाहायला मिळतं. फ्रीजमध्ये अन्न ठेवून ते पुन्हा खाणे हे खूप सामान्य आहे. बऱ्याच घरांमध्ये, जर जास्त अन्न शिल्लक राहिले तर ते फ्रीजमध्ये ठेवले जाते.

कधी कधी वेळेअभावी लोक दिवसभराचे अन्न एकदा शिजवतात आणि ते फ्रीजमध्ये ठेवतात आणि नंतर ते हळूहळू खातात. फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न खाण्याचे कारण काहीही असो. मात्र त्याबाबत काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक असते. अन्यथा आजारी पडण्यास वेळ येईल.

उन्हाळ्याप्रमाणेच पावसाळ्यातही अन्नाची जास्त काळजी घ्यावी लागते. म्हणून जर तुम्ही फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न खाल्ले तर या छोट्या चुका अजिबात करू नका. नाहीतर त्याचा परिणाम शरीरावर देखील होण्यास सुरुवात होईल.

**फ्रिजमध्ये अन्न ठेवताना कोणती काळजी घ्यावी?**

अन्न थंड झाल्यावरच फ्रीजमध्ये ठेवा. गरम अन्न कधीही फ्रिजमध्ये ठेवू नये. जेव्हा गरम अन्न फ्रिजच्या थंड तापमानात ठेवले जाते तेव्हा दोन्हीच्या तापमानात खूप फरक असतो आणि त्यामुळे अन्नाची चव खराब होते.

**शिजवलेले अन्न दोन तासांच्या आत फ्रीजमध्ये ठेवा**

जर तुम्ही अन्न शिजवले असेल तर ते थंड करा आणि दोन तासांच्या आत फ्रिजमध्ये ठेवा. अन्न थंड झाल्यानंतर त्यात बॅक्टेरियाची वाढ होऊ लागते. म्हणून जर अन्न दोन तास खोलीच्या तपमानावर ठेवले तर ते खराब होऊ लागते. म्हणून, ते दोन तासांच्या आत फ्रिजच्या आतमध्ये थंड वातावरणात ठेवा.

**फक्त एकदाच गरम करा**

फ्रिजमध्ये ठेवलेले अन्न फक्त एकदाच गरम करा. जर फ्रिजमध्ये जास्त प्रमाणात अन्न असेल तर आवश्यक तेवढे बाहेर काढून गरम करा आणि उरलेले अन्न फ्रिजमध्ये ठेवा. एकदा गरम झाल्यावर ते पुन्हा फ्रिजमध्ये ठेवले तर त्याचे पोषण नष्ट होऊ लागते.

**अन्न पुन्हा फ्रिजमध्ये ठेवू नका**

जर तुम्ही शिजवलेले अन्न रेफ्रिजरेटरमधून बाहेर काढले असेल आणि ते खोलीच्या तापमानात आल्यानंतर ते परत रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नका कारण अशा अन्नात बॅक्टेरिया वाढू लागतात आणि नंतर ते खराब होते.

**उघडे अन्न फ्रीजमध्ये ठेवू नका**

जर तुम्ही फ्रिजमध्ये उघडे अन्न ठेवले तर इतर अन्नांवर आणि फ्रिजमध्ये बॅक्टेरिया राहण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अन्न खराब होते.

**रेफ्रिजरेटरचे तापमान तपासा**

जर रेफ्रिजरेटरमध्ये ठेवलेले अन्न खबरदारी घेतल्यानंतरही खराब होत असेल, तर रेफ्रिजरेटरचे तापमान तपासा. रेफ्रिजरेटरचे तापमान किमान ४ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी असावे. तर अन्न खराब होणार नाही.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## रस्त्यावरील खड्डे..!

आंधळं आहे सरकार
बहीरे आहेत अधिकारी
भेसळयुक्त मटेरीयलमुळे
जिवाने जाती पादचारी..

ठेकेदारांनो नाही मनाची
तर जनाची लाज धरा
चार महीन्यात पडावे खड्डे
हे उचित वाटते का गडे?

विदेशी पर्यटक येती
जातात करुन भ्रमती
भारताबद्दल कल्पना करा
ते काय रिमार्क देती ?..

जैसी करणी वैसी भरणी
हा विधात्याचा न्याय
कफन को जेब नही होती
हे विसरुन चालणार नाय..!

# अदाणी ग्रुप उभारणार जागतिक दर्जाचे, किफायतशीर आणि एआय-आधारित हेल्थकेअर इकोसिस्टम



**मुंबई, १२ जुलै :** जगभरातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत अदाणी ग्रुपचे चेअरमन गौतम अदाणी यांनी भारताच्या हेल्थकेअर क्षेत्रासाठी एक दूरदृष्टीपूर्ण आणि परिवर्तनात्मक कल्पना मांडली. भविष्यातील गरजांचा विचार करता संपूर्ण आरोग्य व्यवस्थेची नव्याने रचना करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

द ताज महाल पॅलेस हॉटेल येथे आयोजित सोसाइटी फॉर मिनिमली इनवेसिव्ह स्पाइन सर्जरी एशिया पॅसिफिकच्या पाचव्या वार्षिक संमेलनात बोलताना अदाणी म्हणाले की, भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित, मल्टीडिसिप्लिनरी हेल्थकेअर इकोसिस्टम उभारण्याचा त्यांचा उद्देश आहे जे जागतिक दर्जाचे, सुलभ, किफायतशीर आणि मोठ्या प्रमाणावर लागू करता येण्याजोगे असेल. आपण भारताच्या उज्ज्वल उद्यासाठी एक एकात्मिक, सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी हेल्थकेअर सिस्टम तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत, असेही ते म्हणाले.

अदाणी यांनी भारतात लोअर बॅक पेन (कंबरेखालील पाठदुखी) हे अपंगत्वाचे सर्वात मोठे कारण आहे असे सांगितले. ही समस्या डायबिटीज आणि हृदयविकारांपेक्षा अधिक गंभीर झाल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्याला जर देशाच्या स्वप्नांचा भार पेलायचा असेल, तर आधी देशवासियांची 'रीढ' म्हणजेच पाठ मजबूत आणि निरोगी ठेवण्यावर लक्ष द्यावं लागेल. असं ते म्हणाले. या संमेलनात उपस्थित असलेल्या जगभरातील स्पाइन सर्जन्स आणि तज्ज्ञांना त्यांनी आवाहन केले की, फक्त वैद्यकीय क्षेत्राचे नेते म्हणून नका काम करु, तर राष्ट्रनिर्मितीतही सक्रिय भाग घ्या. अहमदाबाद आणि मुंबई येथे उभारल्या जाणाऱ्या १००० बेडच्या अदाणी हेल्थकेअर टेम्पल्सचा उल्लेख करताना अदाणी म्हणाले की, हे जागतिक दर्जाचे, किफायतशीर आणि एआय-आधारित हेल्थकेअर हब असतीलज्यात मॉड्यूलर आणि स्केलेबल पायाभूत सुविधा असतील ज्या साथीच्या आजाराच्या किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत वेगाने वाढवता येतील. हे कॅम्पस क्लिनिकल केअर, संशोधन आणि शैक्षणिक प्रशिक्षणासाठी उत्कृष्टतेची केंद्रे बनतील, ज्यांचे मार्गदर्शन मायो क्लिनिकच्या डिझाइन, वैद्यकीय पायाभूत सुविधा, नवकल्पना (इनोव्हेशन) आणि जागतिक कौशल्याद्वारे केले जाईल.

गौतम अदाणी म्हणाले, आम्ही हेल्थकेअर क्षेत्रात यासाठी आलो नाही की इथे प्रगतीचा वेग कमी होता, तर यासाठी आलो की हा वेग पुरेसा नव्हता. हेल्थकेअर क्षेत्राला थोड्याफार सुधारणांची आवश्यकता नाही, तर बुद्धिमत्ता आणि संवेदनशीलतेसह परिवर्तनाची आवश्यकता आहे. त्यांनी आरोग्य क्षेत्रासाठी पाच मूलभूत तत्त्वांवर आधारित भविष्यातील एक प्रणाली मांडली:

* पारंपरिक विभागांच्या मर्यादा मोडणारी एकात्मिक आरोग्यसेवा
* मॉड्युलर आणि स्केलेबल पायाभूत सुविधा
* रोबोटिक्स आणि एआय आधारित वैद्यकीय शिक्षण
* नर्सिंग आणि पॅरामेडिकल प्रशिक्षणावर भर
* कागदपत्रांपेक्षा रुग्णाला प्राधान्य देणारे हेल्थ इन्शुरन्स मॉडेल

अदाणी यांनी वैद्यकीय उद्योजकांना एआय-आधारित स्पाइनल डायग्नोस्टिक्स, ग्रामीण भागात सर्जिकल युनिट्स, आणि रोबोटिक स्पाइनल केअरसाठी जागतिक केंद्र उभारण्यासाठी नव्या आणि धाडसी क्षेत्रांचा शोध घेण्याचे आह्वान केले.

मुंबईतील हिऱ्यांच्या व्यापारापासून ते मुंद्रा येथील भारताच्या सर्वात मोठ्या खासगी बंदर बांधण्यापर्यंतच्या प्रवासाचा उल्लेख करताना ते म्हणाले, आज तुम्ही जी रीढ वाचवाल, ती कदाचित उद्या पूल बांधणाऱ्या इंजिनियरची असेल, पुढची लस शोधणाऱ्या शास्त्रज्ञाची किंवा नव्या युगातील यशस्वी उद्योजकाचीही असू शकते.

आतापर्यंत अदाणी ग्रुपने आरोग्य, शिक्षण आणि कौशल्य विकासासाठी ६०,००० कोटी रुपयांचे योगदान दिले आहेत. त्यामुळे हे हेल्थकेअर क्षेत्रातील पाऊल भारताच्या राष्ट्रनिर्माण मिशनचा अविभाज्य भाग ठरतो. समारोपात गौतम अदाणी म्हणाले, भारत तेव्हाच पुढे जाईल, जेव्हा त्याचे लोक उभे राहतील आणि लोक तेव्हाच उभे राहतील, जेव्हा आपण त्यांच्यासोबत उभे राहू. चला आपण सर्व मिळून एका महान राष्ट्राचा कणा मजबूत करूया!

# झी टीव्हीवरील शो तुम से तुम तकच्या सच्चेपणावर प्रेक्षकांचा प्रेमाचा वर्षाव! प्रतिक्रियांचा जबरदस्त ओघ!



**मुंबई, १२ जुलै :** झी टीव्हीवरील दीर्घप्रतिक्षित मालिका तुम से तुम तकने जोरदार सुरुवात केली आहे आणि प्रसारणाला सुरुवात होताच देशभरातील प्रेक्षकांकडून या मालिकेला प्रेम आणि कौतुकाचा वर्षाव झाला आहे. या मालिकेतील वास्तववादी पात्रे आणि सादरीकरणामुळे अगदी काहीच भाग प्रसारित होऊनही हा शो प्रेक्षकांच्या भावनांना स्पर्शून गेला आहे.

या उत्स्फूर्त स्वागतामागचे मुख्य कारण म्हणजे मुख्य पात्रांचे ताजेतवाने आणि वास्तववादी चित्रण. प्रेक्षक अनू (निहारिका चौक्सी) या मध्यमवर्गीय घरातील, १९ वर्षांची उत्साही आणि निडर तरुणीशी मनापासून जोडले गेले आहेत. दुसरीकडे आर्यवर्धन (शरद केळकर) हा ४६ वर्षांचा एकाकी उद्योजक आहे, जो स्वतःच्या गुंतागुंतीच्या अंतरंगात गुरफटलेला आहे. या परस्परविरोधी जगण्यांना ताकदीच्या लेखनातून, सुंदर अभिनयातून आणि टोकाच्या संघर्षांशिवाय उभ्या राहिलेल्या दृश्यांतून जिवंत करण्यात आले आहे.

हाय-ग्लॉस टेलिव्हिजनच्या युगात तुम से तुम तकने आपल्या प्रामाणिकतेसाठी प्रचंड वाहवा मिळवली आहे. अनूच्या हसत्याखेळत्या कुटुंबापासून दिल्लीच्या गल्ल्यांतील आयुष्यापर्यंत, वास्तविक ठिकाणी चित्रीकरण करण्याच्या निर्णयाने मालिकेला विशेष वास्तविकता आणि आकर्षकपणा मिळतो. प्रेक्षकांनीही याचे कौतुक करत पात्रांना डीपली रिलेटेबल आणि 'ग्रेट केमिस्ट्री' असलेले म्हटले आहे.

या मालिकेच्या भावनिक खोलीचे आणि प्रामाणिकतेचे कौतुक सोशल मीडियावरही उसळले आहे चाहत्यांचे मेसेजेस, कमेंट्स आणि पोस्ट्स यांमुळे सोशल मीडिया भरून गेले आहे. हे स्पष्ट झाले आहे की प्रेक्षक केवळ तुम से तुम तक बघत नाहीयेत, तर ते त्याचा अनुभव घेत आहेत.

शरद केळकर म्हणाला, फक्त काही प्रोमोज आणि भाग प्रसारित झाल्यानंतर ज्या प्रतिक्रिया मिळाल्या आहेत, त्याने मी खूप भारावून गेलो आहे. लोक आर्यवर्धनच्या शांत स्वभावाकडे, त्याच्या संयमाकडे, आणि कोणताही नाटकीपणाशिवाय त्याच्या भावना कशा प्रकट होतात, याकडे लक्ष देत आहेत. काही प्रेक्षकांनी मला सांगितले की त्यांना त्याच्यात स्वतःचे प्रतिबिंब दिसते एक अभिनेता म्हणून ही सर्वात मोठी शाबासकी आहे. अशी कथा ज्यामध्ये शांततेतही ताकद आहे आणि जी हळूच मनात घर करून जाते तुम से तुम तक ने ते सिद्ध केले आहे.

निहारिका चौक्सी पुढे म्हणाली, खरं सांगायचं तर, मला सुरुवातीला एवढ्या प्रेमाची अपेक्षा नव्हती वैयक्तिक गोष्टी शेअर करणारे संदेश, अनूच्या छोट्या छोट्या भाव-भावनांना टिपणारी चाहत्यांची संपादने, सगळंच विलक्षण आहे. पण मनाला खरी स्पर्शून जाणारी गोष्ट म्हणजे अनेक प्रेक्षक अनूमध्ये स्वतःला पाहतात. पहिल्याच आठवड्यात लोक तिच्या प्रवासाशी भावनिक पातळीवर जोडले गेले आहेत आणि हे मनापासून हृदयस्पर्शी आहे.

आजच्या काळात जिथे प्रेक्षकांच्या अपेक्षा सतत बदलत आसतात, तिथे तुम से तुम तक भारतीय टेलिव्हिजनवर एक वेगळी आणि उठून दिसणारी मालिका बनली आहे. तिच्या प्रामाणिकतेमुळे आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध कथनशैलीमुळे, ही मालिका प्राइमटाइममध्ये हे सिद्ध करत एक नवे परिमाण निर्माण करते की प्रेमकथाही असामान्य आणि खोलवर पोहोचणारी असू शकते.

# क्रोमामध्ये उत्पादनांवर अतिरिक्त १0%* ची सूट मिळवा

**नागपूर, ११ जुलै :** भारतातील आघाडीचे ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर, टाटा समूहातील एक सदस्य क्रोमाने जुलै महिन्यात आपले एक्स्ट्रा डील डेज कॅम्पेन सुरु करून ग्राहकांचा उत्साह वाढवला आहे. आठवड्यातील कामकाजाचे दिवस खरेदीच्या एका शानदार अनुभवांमध्ये बदलावेत यासाठी डिझाईन करण्यात आलेले हे कॅम्पेन, देशभरातील २०० पेक्षा जास्त शहरांमध्ये विस्तारलेल्या क्रोमाच्या विशाल नेटवर्कमधील ५६0 पेक्षा जास्त स्टोर्समध्ये सोमवार ते शुक्रवारपर्यंत एक्सक्लुसिव्ह डेली डील्स मिळत आहेत. क्रोमामध्ये ग्राहकांना मिळत आहे, इलेक्ट्रॉनिक्स व गॅजेट्सच्या खूप मोठ्या रेन्जवर आकर्षक सूट, त्यासोबतच प्रमुख उपकरणांवर स्पेशल सीजनल ऑफर्सचा देखील तुम्ही लाभ घेऊ शकता. तुमच्या घरातील आवश्यक उपकरणे अपग्रेड करण्याचा, स्मार्ट खरेदी करण्याचा आणि जास्तीत जास्त बचत करण्याची हीच सर्वात योग्य संधी आहे. क्रोमा-ब्रँडेड उत्पादनांवर एक्सक्लुसिव्ह डील्सचा लाभ घेऊन, ग्राहक आपल्या खरेदीचा अनुभव अधिकाधिक आनंददायी करू शकतील, झिपकेयर प्रोटेक्शन प्लॅन्सचा लाभ घेऊन अधिक जास्त मनःशांती मिळवू शकतील. याखेरीज लवचिक ईएमआय पर्याय, इन्स्टन्ट बँक डिस्काउंट आणि एक्स्चेंज रिवॉर्ड्सचा लाभ घेऊन आपल्या खरेदीविषयी निश्चिन्त राहू शकतील. क्रोमामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा, योजना तुमची प्रत्येक खरेदी अधिकाधिक स्मार्ट आणि अधिकाधिक लाभदायक बनवतील.

# टाटा एआयजीचा नागपूरकरांना आग्रह, आपल्या वाहनांची स्मार्ट काळजी घ्या

**नागपूर, ११ जुलै :** भारतीय हवामान खात्याने नागपूर आणि वर्ध्याला लाल अलर्ट जारी केला आहे, जोरदार पावसामुळे रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शाळा आणि महाविद्यालयांना सुट्ट्या द्याव्या लागल्या आहेत, रस्ते पाण्याने भरले आहेत. विदर्भातील रस्ते पाण्याने तुडूंब भरलेले असणे हे एक नेहमीचे चित्र बनले आहे. या संदर्भात, वाहनांची सुरक्षा आणि त्यासाठीची आर्थिक तयारी या दोन्ही गोष्टी हवामानाविषयीच्या अंदाजाइतक्याच महत्त्वाच्या बनल्या आहेत.

आरटीओ डेटानुसार, नागपूर शहरात २0 लाखांहून जास्त नोंदणीकृत वाहने आहेत, दररोज २०० पेक्षा जास्त नवीन वाहने रस्त्यावर येतात. वेगाने होत असलेले शहरीकरण आणि खाजगी वाहनांच्या वापरात होत असलेली वाढ यामुळे वाहनांना धोका उद्भवण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. खासकरून जोरदार पाऊस आणि पूर परिस्थितीत वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता खूप जास्त वाढते.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक वाहनधारकाकडे विश्वसनीय मोटार विमा योजना असणे अत्यंत आवश्यक आहे. टाटा एआयजीच्या सर्वसमावेशक मोटार विमा पॉलिसी या मान्सूनमध्ये उद्भवणाऱ्या धोक्यांपासून बचाव करण्यासाठी विशेष डिझाईन करण्यात आल्या आहेत. पाण्यामुळे होणारे नुकसान, इलेक्ट्रिकल समस्या आणि अचानक गाडी बंद पडणे अशा विविध धोक्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

टाटा एआयजीचे चीफ अंडररायटिंग आणि डेटा सायन्स ऑफिसर, नील छेडा यांनी सांगितले, नागपुरातील हवामान खूपच लहरी, अंदाज न लावता येण्याजोगे झाले आहे. वाहन मालकांनी त्यानुसार तयारी करणे आवश्यक आहे. आमच्या मोटार विमा योजना स्थानिक पातळीवरील धोके लक्षात घेऊन, खासकरून मान्सूनमुळे येणाऱ्या आव्हानांसाठी तयार करण्यात आली आहेत. इंजिन संरक्षण आणि इलेक्ट्रिक सर्ज कव्हर यासारख्या वैशिष्ट्यांसह पॉलिसीधारकांना या अतिशय धोकादायक सीझनमध्ये मनःशांती मिळवून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

गेल्या वर्षी १ कोटींपेक्षा जास्त पॉलिसी इश्यू केल्या गेल्या आणि सुरुवातीपासून आजपर्यंत ५ कोटींपेक्षा जास्त ग्राहकांना सेवा पुरवण्यात आल्या आहेत. मोटार विमा उद्योगक्षेत्रातील विश्वसनीय नेतृत्व टाटा एआयजीने यामधून अधोरेखित केले आहे. याखेरीज जिल्हा प्रशासनाने ०७१२-२५६२६६८ आणि १०७७ या हेल्पलाईन क्रमांकांवर देखील मदतसेवा सुरु केली आहे.

# सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत अभिनेता रजत वर्मा साकारणार विराटचे पात्र

**मुंबई, १२ जुलै :** सोनी सबवर लवकरच इत्ती सी खुशी ही कौटुंबिक मालिका सुरू होणार आहे. त्यातील हृदयस्पर्शी कथानक आणि दमदार कलाकार यामुळे प्रेक्षकांची या मालिकेबद्दलची उत्सुकता वाढली आहे. अभिनेता रजत वर्मा विराट या व्यक्तिरेखेच्या रूपात मालिकेत दाखल झाला आहे. अन्विता (सुम्बुल तौकीर खान)च्या गजबजलेल्या जीवनात विराटचे एक शांत पण गुंतागुंतीचे अस्तित्व आहे.

विराट हा टेलिव्हिजनवरील सर्वसामान्य नायकासारखा नाही. तो थोडा रहस्यमय आणि अंतर्मुख आहे. वरकरणी तो बोल्ड, मदतीला धावून जाणारा आणि इतरांसाठी आवर्जून काही करणारा वाटतो. पण अन्वितासाठी विराट एक कोडे आहे. त्याच्यातील आपुलकी नेहमी दिसते, पण त्याच्या मोहकतेखाली एक जटिल भूतकाळ आहे, जो लपवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. यामुळे त्याच्या आणि अन्विताच्या नात्यात अडथळा येतो. तो तिच्या जीवनातील काहीसा अनाकलनीय असा माणूस आहे.

आपल्या व्यक्तिरेखेविषयी बोलताना रजत वर्मा म्हणतो, इत्ती सी खुशी एक खास कहाणी आहे. ही कहाणी आहे, छोट्या छोट्या आनंदांची, मूक त्यागाची आणि जीवनाला वेगळा आकार देणाऱ्या अनपेक्षित नात्यांची आहे. विराट आणि अन्विता यांच्यातील नात्याला खास टीव्ही शैलीचा रोमान्स म्हणता येणार नाही. ते संथ आहे, त्याला अनेक कंगोरे आहेत आणि उघड उघड नाही, तर शांततेच्या क्षणांवर ते उभे राहिले आहे. अन्विताचे आयुष्य तर आपल्या भावंडांना सांभाळण्यात, त्यांची जबाबदारी पार पाडण्यात व्यतीत होत आहे. अशा एकसुरी जीवनात विराटचे आपल्या मनात काही स्थान आहे, याची तिला जाणीवही नाही. हा स्थिरपणा आणि आपुलकी पडद्यावर जिवंत करण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य मानतो.

# पावसाळ्यादरम्यान आयुर्वेद आहार : नैसर्गिकरित्या चमकदार व आरोग्यदायी त्वचा मिळवण्यासाठी तज्ञांचा सल्ला



**आयुर्वेद तज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन यांचा लेख**

पावसाळ्यादरम्यान त्वचा निस्तेज, निरूत्साही दिसते आणि त्वचेवरील चमक कमी होते. प्रत्येकजण त्वचेला आतून पोषण देणाऱ्या उपायांचा शोध घेतो, जे अनेक वेळा वापरण्यासह तात्पुरत्या काळापर्यंत आराम देतात, ज्यामुळे मुरमं, काळे डाग, खाज सुटणे यांसारखे प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. म्हणून, आयुर्वेद तज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन त्वचा कोमल ठेवण्यासाठी आणि त्वचेला आतून पोषण देण्यासाठी सोप्या नैसर्गिक उपायांची शिफारस करतात. त्या आरोग्यदायी आहाराचे सेवन करण्यासोबत आहारामध्ये बदाम, हर्बल चहा व हळद अशा नैसर्गिक खाद्यपदार्थांचा समावेश करण्याचा सल्ला देतात. आयुर्वेदामधून मार्गदर्शन मिळते की, आरोग्यदायी आहाराच्या सेवनामुळे वात, पित्त व कफ या तीन दोषांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते, ज्यामुळे त्वचा कोमल व एकूण आरोग्य उत्तम राहण्याची खात्री मिळते, जेथे आरोग्यदायी त्वचेसाठी उत्तम चयापचय क्रिया महत्त्वाची आहे.

**आहारामध्ये बदामांसारख्या पौष्टिक खाद्यपदार्थांचा समावेश करा**

बदामांमध्ये वात दोष संतुलित करण्याची क्षमता आहे, तसेच बदाम हंगामी परिवर्तनामुळे होणाऱ्या परिणामांवर नियंत्रण ठेवतात, शरीराला बळकटी देतात आणि उतींना आतून पोषण देतात. खरेतर, संपूर्ण भारतातील लोक पालन करणाऱ्या पारंपारिक आयुर्वेदामध्ये बदामांना महत्त्वाचे स्थान आहे. त्वचेच्या आरोग्यासंदर्भात डॉ. मधुमिता आरोग्यदायी व चमकदार त्वचेसाठी दैनंदिन स्नॅकमध्ये बदामांची भर करण्याची शिफारस करतात. तसेच आयुर्वेद, सिद्ध व युनानी ग्रंथ त्वचेच्या आरोग्यासाठी बदामांचे फायदे निदर्शनास आणतात, त्वचेची चमक व कोमलता वाढवण्याच्या बदामांच्या क्षमतेवर भर देतात.

**आहारामध्ये हर्बल चहाचा समावेश करा**

आले, तुळस (पवित्र तुळस) आणि कॅमोमाइल सारख्या हर्बल चहा शरीराला विषारी पदार्थांपासून मुक्त करण्यास आणि पचनशक्ती सुधारण्यास मदत करतात, ज्यामुळे त्वचा कोमल होते. हे हर्बल चहा दोष (वात, पित्त आणि कफ) संतुलित करतात आणि जळजळ कमी करतात, ज्यामुळे मुरुमांसारख्या त्वचेच्या समस्या टाळण्यास मदत होते. पचनशक्ती सुधारण्यासाठी आणि त्वचेला आतून पोषण देण्यासाठी ताज्या आल्याचे तुकडे पाण्यात उकळून आणि चवीसाठी मध घालून स्वादिष्ट आल्याची चहा तयार करण्याचा सल्ला डॉ. मधुमिता देतात.

**हंगामी फळे व भाज्यांचे सेवन करा**

आयुर्वेदामध्ये डाळिंब, सफरचंद आणि पेअर यांसारखी हंगामी फळे खाल्ल्याने शरीरातील दोष संतुलित होतात, काही फळांच्या सेवनामुळे पचनक्रिया सुधारते, तर काही फळे शरीराला पोषण देतात आणि व्यक्तीचे एकूण आरोग्य उत्तम ठेवतात असे मानले जाते. काहीशी गोड-आंबट असलेली फळे वात दोषवर नियंत्रण ठेवतात, उती चयापचयात सुधारणा करतात, ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहण्यासोबत त्वचेची चमक वाढते. या फळांचा दैनंदिन आहारात स्नॅक्स म्हणून आस्वाद घ्या किंवा सॅलड आणि स्मूदीमध्ये समाविष्ट करा.

**हिरव्या पालेभाज्यांचे सेवन केलेच पाहिजे**

आयुर्वेदामध्ये पालक, मेथी, धणे यांसारख्या पालेभाज्या त्यांच्या कडू, तुरट चवीमुळे रक्त शुद्ध करतात आणि शरीरातील दोष संतुलित करतात, शरीराला डिटॉक्सिफाय करतात, उतींना पोषण देतात, ज्यामुळे त्वचा कोमल आणि तेजस्वी होते. सूप, स्टू किंवा करीमध्ये पालेभाज्या घालून आहारामध्ये समाविष्ट करा आणि उत्तम पोषण मिळवा.

**त्वचेच्या आरोग्यासाठी मसाले वापरून पहा**

आयुर्वेदानुसार, हळद दाहक-विरोधी आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंधक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे, ज्यामुळे हळद त्वचेवरील लालसरपणा कमी करण्यास आणि मुरुमांना प्रतिबंध करण्यास गुणकारी आहे. हळद चवीला कडू असल्याने शरीरातून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते, वात दोष संतुलित करते आणि पचन सुधारण्यास मदत करते. हळदीमध्ये कर्क्यूमिन असते, जे त्वचेची नैसर्गिक चमक वाढवू शकते आणि रंगद्रव्य कमी करू शकते. पौष्टिक पेय म्हणून तुम्ही कोमट दूध व मधामध्ये हळद मिसळून हळदीचा चहा बनवू शकता.

**आरोग्यदायी फॅट्ससाठी तूपाचा वापर करा**

आयुर्वेदानुसार, तूप हे उत्साहित करणारे अमृत मानले जाते, जे दोषांना संतुलित करते आणि आतून पोषण देत त्वचेचे आरोग्य उत्तम ठेवते. आरोग्यदायी फॅट्सचा स्रोत असलेले तूप त्वचेला आतून पोषण देते, त्वचा कोमल आणि मॉइश्चरायज्ड ठेवते. तूपामध्ये अँटीऑक्सिडंट्स देखील असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि अकाली वृद्धत्वापासून त्वचेचे संरक्षण करण्यास मदत करतात. पौष्टिक नाश्त्यासाठी, कोमट दूध किंवा लापशीमध्ये थोडेसे तूप घाला.

शरीराला डिटॉक्सिफाय करण्यासाठी, वात दोष संतुलित करण्यासाठी, पचनशक्ती सुधारण्यासाठी आणि सर्व उतींना पोषण देण्यासाठी त्वचेची काळजी घेण्याच्या दिनचर्येत आयुर्वेदिक पद्धतींचा समावेश करून नैसर्गिक उपचारांचा अवलंब करण्याची शिफारस डॉ. मधुमिता करतात. हा दृष्टिकोन त्वचेला जळजळ, ॲलर्जी आणि दीर्घकालीन आरोग्यसंबंधित धोक्यांपासून वाचवण्यास मदत करू शकतो, ज्यामुळे एकूण त्वचेचे आरोग्य आणि स्वास्थ्य सुधारते.

# सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगच्या मि. मजनू या दुसऱ्या छुप्या रूपाकडे कैरी आकर्षित होत आहे

**मुंबई, १२ जुलै :** हृदयस्पर्शी कथानक आणि भावनांचे चढउतार दर्शविणाऱ्या उफ्फ ये लव है मुश्किल ... या सोनी सबवरील मालिकेकडे प्रेक्षक आकर्षित होत आहे. या कथानकाच्या मध्यात आहे, युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) जो एक अत्यंत बुद्धिमान पण आपल्या मनाच्या जखमा झाकण्यासाठी तुटकपणाचा मुखवटा घेऊन वावरणारा वकील आहे; आणि कैरी शर्मा (आशी सिंह) जी अत्यंत आशावादी तरुणी आहे आणि प्रेमाच्या ताकदीवर तिचा विश्वास आहे. नियतीने त्यांना एकत्र आणायचे ठरवले आहे, पण त्यांची परस्पर विरुद्ध विचारसरणी, आणि त्या दोघांचे भूतकाळ यामुळे त्या दोघांमध्ये सतत संघर्ष होत राहतात. अलीकडच्या भागांमध्ये, कैरीची हरवलेली बहीण इमरती (दीपल सतिजा) हिला शोधण्यासाठी कैरी आणि युगने आपसातले मतभेद दूर ठेवले आहेत. इमरतीचा शोध घेत असताना त्यांच्यापुढे एक भयंकर सत्य येते: इमरतीचे अपहरण इतर कुणी नाही, तर कैरीचे वडील कुंदन (मानवेंद्र झा) यांनीच केले असते. कुंदन परतून आल्याचे समजल्यावर कैरीचे कुटुंब हादरून जाते.

आगामी भागांमध्ये, कैरी आपल्या भावंडांचे रक्षण करताना, भावनिक वादळाला तोंड देताना दिसेल. या गोंधळात काही जुन्या ऑडिओ टेप कैरीच्या हाती लागतात, ज्यांच्यावर मि. मजनू लिहिलेले असते. त्या टेपमधील शांत आणि लाघवी आवाज ऐकून कैरी नकळत त्या अज्ञात आवाजाकडे आकर्षित होते आणि त्या आवाजाशी तिचे घनिष्ठ, भावनिक नाते जुळते. तिला हे माहीत नाही की हा आवाज स्वतः युगचाच आहे आणि तो आपल्या छुप्या व्यक्तिमत्त्वाच्या तोंडून बोलत आहे. अशाप्रकारे, युग नकळत कैरीचा आधार बनतो, तिला दिलासा देतो, एक दृष्टिकोन देतो आणि तिला गरजेच्या क्षणी ताकद देतो. त्याचे शब्द कैरीच्या तुटणाऱ्या कुटुंबास सावरतात. आणि पुन्हा तिला तिची मूळ ऊर्जा प्रदान करतात. एकीकडे कैरी या न पाहिलेल्या मार्गदर्शकाकडे आकर्षित होत आहे, आणि दुसरीकडे, युग हाच आपल्या दुःखाचे कारण आहे असे तिला वाटते. ज्याला आपण दोष देत आहोत, त्याचाच आधार आपण घेत आहोत, हे तिच्या गावीही नाही.

तिच्या जखमांवर फुंकर घालणारा माणूस हा तिच्या मते, तिचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा माणूसच आहे, हे समजल्यावर काय होईल?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, कैरीची परिस्थिती खूप नाजुक झाली आहे. एकावेळी अनेक आघाड्यांवर ती लढा देत आहे. आपल्या भावंडांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करताना कुंदनच्या करस्थानांना तोंड देत आहे. आणि अशा वेळी अचानक एका अनोळखी आवाजात तिला मनःशांती मिळते. या कथेमधील ही गोष्ट मला आवडली की, यामध्ये दाखवले आहे की, मानवी नाते किती अनपेक्षित ठिकाणी जुळू शकते. भावनिक दृढतेसाठी कैरी स्वतःच्याही नकळत मि. मजनूच्या आवाजावर विसंबू लागते. यात मोठा विरोधाभास असा आहे की, ज्या माणसाने आपले वाकडे केले आहे, असे तिला वाटते आहे, त्याच माणसाचा आधार तिला वाटतो आहे. एक अभिनेत्री म्हणून कैरीच्या मनाची अवस्था पडद्यावर साकारणे, वेदनेपासून ते आशेपर्यंतचा तिचा झालेला प्रवास व्यक्त करणे अत्यंत समाधानकारक आहे. कैरी आणि मि. मजनू यांच्यातील हे आगळेवेगळे नाते कसे उलगडते आणि तिच्या आणि युगच्या कहाणीला त्यामुळे काही वेगळे वळण मिळते का हे प्रेक्षकांना बघायला नक्की आवडेल.

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी खर्चिक राहील. विद्यार्थ्यांनी आज आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. गुंतवणुकीच्या बाबतीत आजचा दिवस चांगला राहील.

वृषभ : कोणताही कायदेशीर वाद सुरु असल्यास त्यात तुम्हाला यश मिळेल. तुम्हाला आज भावांकडूनही मदत मिळेल. आज शुभ कार्यांवर तुम्ही पैसे खर्च करू शकता. महत्त्वाची जबाबदारीही दिली जाऊ शकते.

मिथुन : आजचा दिवस सामान्य राहील. तुमच्या आसपासचे वातावरण आज सुखद राहील. तुम्हाला आज चांगली बातमी मिळेल. कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये आनंद दिसेल.

कर्क : आजचा मानसिक तणावपूर्ण राहील. तुमची तब्येत आज नरम राहील, ज्यामुळे तुमचे मन कामात लागणार नाही. तुमच्या कुटुंबात आज एखादे शुभ कार्य होईल. ज्यामुळे घरात आनंदाचे वातावरण असेल.

सिंह : जे लोक भागीदारीत काम करतात, त्यांना व्यवसायात आज विशेष फायदा होईल. जर तुम्ही गुंतवणुकीची योजना करत असाल, तर यात तुम्हाला नशिबाची साथ मिळेल.

कन्या : आजचा दिवस सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून चांगला राहील. तुम्ही तुमच्या विचारशक्तीने आज फायदा मिळवू शकता. तुम्हाला आज कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारीही मिळू शकते.

तुळ : आर्थिक बाबतीत मात्र आज कोणतीही जोखीम घेऊ नका. आज तुमची अडलेली कामं पूर्ण होतील. तुम्हाला आज कौटुंबिक जीवनात कोणतीतरी चांगली बातमी मिळेल. कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवाल.

वृश्चिक : आजचा दिवस दिलासा देणारा असेल. आज तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि यामुळे तुम्ही तुमचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. बोलण्यातील नम्रता आज तुम्हाला आदर देईल.


धनु : आज तुम्हाला आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा मोठा वाद होऊ शकतो. वैवाहिक जीवनात आज जीवनसाथीच्या तब्येतीत बिघाड झाल्यामुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो.

मकर : आज तुम्ही इतर कोणाबद्दल थोडे बोलणे टाळले पाहिजे. जर तुम्ही तुमचे काम करत असाल तर ते तुमच्यासाठी चांगले असेल. दीर्घ काळानंतर तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला भेटू शकता.

कुंभ : आज नोकरी आणि व्यवसायात यश मिळेल. तुम्ही आज फायदा मिळवण्यासाठी कमी कालावधीच्या गुंतवणुकीतही पैसे गुंतवू शकता. मुलांकडून एखादी आनंदाची बातमी मिळेल.

मीन : अनेक दिवसांपासून सुरू असलेली आर्थिक देवाणघेवाणीची समस्या आज संपेल. आज प्रवासाचे योग बनतील. अचानक पैसा मिळेल. मित्रांकडून तुम्हाला भरपूर फायदा मिळू शकतो.

# शब्दकोडे क्रमांक २१६३



**आडवे शब्द :-**
१) पॅसिफिक महासागर
६) व्यायाम
१०) वाईट
१२) वडील
१३) राजाचा राज्य करण्याचा कालावधी
१५) मोगऱ्याची एक जात
१७) उपवासाला चालणारे एक कंदमूळ
१८) पळून जाणे
२०) पवित्र
२१) रात्री चमकणारा किडा
२३) गोष्टी सांगणे
२६) समुद्र
२८) मंत्रीमंडळ
३१) अथवा, किंवा
३३) दावानल
३५) गावातील जुनी वस्ती
३६) खूप खाली
३८) पुन्हा
४०) पत्रातील ता क
४३) जगाचे कालचक्र
४५) कार्य, काम
४६) जामात
४७) पत्र
४९) सुसर
५१) गहू, जव इ चे सत्व
५३) खरगोश
५६) युद्धासाठी उतावीळ झालेला
५९) आघात, घाव
६०) आच्छादन
६२) वायू, समईतील कापसाची वळी
६४) एक द्विदल धान्य
६६) नूतन
६७) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
६९) खोटा (राग)
७०) देव
७१) आईवडील
७५) लापशी
७६) सामान
७७) विहीरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
८१) पुष्कळ
८२) संतती
८३) किंमत, प्रत्येक

**उभे शब्द :-**
१) फसवणूक
२) शांती, समाधान, निवांतपणा
३) अवघा, सगळा
४) हत्तींचा राजा
५) आवाज, ध्वनी
७) वेळ
८) सुळे
९) शरीर
१०) कप्पा
११) अंड्यातील मगज
१४) गाडीचे छत
१६) लहान मूल
१९) आवडता, प्रिय
२०) पर्ण
२१) सबब, निमित्त
२२) गंध
२४) थापा मारणारा
२५) थट्टा करण्याचा स्वभाव
२७) तृण
२९) रक्षण करणारा
३०) दागदागिने
३२) मेहेरबानी, कृपा
३४) पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३७) बारीकसारीक
३९) पराग
४१) ** जुई दोन जोड फुले
४२) केसांची बट
४४) एक शेंगभाजी
४६) झोप न मिळण्याची अवस्था
४८) बारीक, मऊ केस
५०) गेरू
५२) खेकडा
५४) उंट हाकणारा
५५) नवरा
५७) पोते
५८) पोपट
६०) अफवा, गप
६१) रूक्ष
६३) तृष्णा
६५) थरथर
६७) मला
६८) जिनसांची यादी
७२) ढग, लवकर
७३) पाण्याने भरलेला ढग
७४) मुख
७८) फुलांची माळ
७९) समुद्राच्या लाटांचा आवाज
८०) सदन

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ई-केवायसी न केलेले शिधापत्रिकाधारक रडारवर

## नावं वगळली जाण्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट ( दि. 12 )** -राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या शिधापत्रिका धारकांसाठी शासनाने अनिवार्य केलेली ई-केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण न केलेल्या लाभार्थ्यांची नावे वगळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुरवठा विभागाने जिल्ह्यातील सर्व रेशन दुकानदारांकडून अशा लाभार्थ्यांची माहिती मागविली आहे.

राज्य सरकारकडून शिधापत्रिकाधारकांच्या ओळख पडताळणीसाठी ई-केवायसी मोहिम सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेसाठी 31 मार्च




2025 पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतरही दोन वेळा मुदतवाढ मिळूनही अनेक कार्डधारकांनी ई-केवायसी पूर्ण केलेले नाही. त्यामुळे पुरवठा विभागाने कारवाईचा बडगा उगारण्याचे संकेत दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांची ओळख निश्चित करण्यासाठी राज्यांना सूचना दिल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली.

तरीही अजूनही राज्यात व जिल्ह्यात अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी न केल्याचे पुरवठा विभागाच्या निरीक्षणात आले आहे.पुरवठा विभागाकडून दुबार, मृत किंवा बनावट शिधापत्रिका धारकांची नावे यादीतून वगळण्याचे नियोजन सुरू आहे. त्याचप्रमाणे ई-केवायसी न करणाऱ्या लाभार्थ्यांनाही यादीतून वगळण्याची शक्यता आहे. परिणामी, संबंधित लाभार्थ्यांना पुढे शासकीय रेशनवर धान्य मिळणार नाही.

### नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण

दरम्यान, काही नागरिकांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्याचा दावा करतानाही आपल्या नावाची नोंद शिल्लक राहिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. ई-केवायसी पूर्ण करूनही आमची माहिती अपूर्ण कशी राहिली ? असा सवाल अनेक शिधापत्रिकाधारक करत आहेत. या संदर्भात तांत्रिक अडचणी, अपूर्ण दस्तऐवज किंवा नोंदणी प्रक्रियेत त्रुटी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### पुरवठा विभागाचा इशारा

पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, अनेक वेळा संधी देऊनही ज्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही, त्यांची यादी राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे. त्यानुसार संबंधित शिधापत्रिकांची वैधता रद्द करण्यात येईल. राज्य सरकार लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेणार असून, ज्यांनी अद्यापही ई-केवायसी केली नाही, त्यांनी तातडीने ती पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खासदार बळवंत वानखडे यांचा रेल्वेला इशारा

## पार्डी ( देवी ) भुयारी मार्ग जलमय प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.12 )**-पार्डी (देवी) येथील रेल्वे गेटजवळील भुयारी अंडरपास मागील तीन दिवसांपासून पाण्याने भरल्यामुळे अंजनगाव बारी व परिसरातील नागरिक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने अखेर खासदार बळवंतराव वानखडे यांनी स्वत: घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला आणि रेल्वे प्रशासनाला तातडीचे निर्देश दिले.

खासदार वानखडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, भुयारी मार्गाची कामे पूर्ण होईपर्यंत पार्डी (देवी) रेल्वे गेट तातडीने सुरू करावा, अन्यथा रेल रोको आंदोलन छेडले जाईल. तसेच, त्यांनी हा प्रश्न लोकसभेत उपस्थित करण्याचे आश्वासन स्थानिक नागरिकांना दिले. या पाहणी दौऱ्यावेळी तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, रेल्वे अधिकारी, तसेच अनेक विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय ग्रामपंचायत सदस्य, पोलीस अधिकारी, शिक्षक, सरपंच संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लोकप्रतिनिधींचा आक्रमक पवित्रा

या पाहणीदरम्यान नागरिकांनी संताप व्यक्त करत जलमय झालेल्या अंडरपासमुळे निर्माण झालेल्या संकटांविषयी माहिती दिली. अनेकदा तक्रारी करूनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाळ्यात या मार्गावर नेहमीच पाणी साचते. विद्यार्थ्यांच्या शाळा, कामावर जाणारे नागरिक, रुग्णवाहिका यांच्यावर याचा गंभीर परिणाम होतो.

### काय म्हणाले आमदार रवी राणा



आमदार रवी राणा यांनी देखील घटनास्थळी भेट देऊन आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले,भुयारी मार्गाची पाहणी केली असता नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना होणारी गैरसोय प्रकर्षाने जाणवली. रेल्वे गेट पुन्हा सुरू करून भुयारी मार्गातील पाण्याचा बंदोबस्त करण्यात यावा आणि काम लवकर पूर्ण व्हावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

# मनपा मालकीच्या भूसंपादित भूखंडाचा मोबदला मिळावा

## माजी महापौर चेतन गावंडे यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** -अमरावती-नरखेड रेल्वे लाईनसाठी मौजे अकोली येथील अमरावती महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड भूसंपादित करण्यात आले होते. मात्र, या भूखंडांचा मोबदला रेल्वे विभागाकडून अद्याप प्राप्त न झाल्यामुळे संबंधित अभिन्यासातील विकासकामे रखडली आहेत. या पार्श्वभूमीवर माजी महापौर चेतन गावंडे यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देत तत्काळ मोबदला मिळवून विकासकामे सुरू करण्याची मागणी केली आहे.सदर भूखंड साईनगर प्रभाग क्रमांक 19 अंतर्गत येणाऱ्या मौजे अकोली येथील असून, सर्वे क्र. 3/2 व 16 (क्षेत्रफळ 648 चौ. मी.), सर्वे क्र. 27/1 (180 चौ. मी.) आणि सर्वे क्र. 31/3 (1296 चौ. मी.) असे एकूण तीन भूखंड रेल्वे प्रकल्पासाठी विशेष भूसंपादन अधिकारी, लघु सिंचन कामे, अमरावती यांच्यामार्फत संपादित करण्यात आले.या भूसंपादनाबाबत महापालिकेकडून वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला असला तरी, अद्यापपर्यंत



कोणताही मोबदला प्राप्त झालेला नाही. या भूखंडांचे हस्तांतरण महानगरपालिकेला अभिन्यासातील विकास खर्च म्हणून करण्यात आले होते. त्यामुळे या मोबदल्याच्या प्रतीक्षेत विकासकामे ठप्प झाली आहेत.माजी महापौर चेतन गावंडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भूखंडाचा मोबदला लवकरात लवकर महापालिकेला मिळवून द्यावा, जेणेकरून नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली विकासकामे सुरू करता येतील. तसेच यासंदर्भात तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# उत्साहात पार पडला अंबाडा ते लाखनवाडी पालखी सोहळा

## अन्नदानासह चहा-नाश्त्याची सेवा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.12 )**-

गुरुपौर्णिमेनिमित्त संत गुणवंत बाबा टेकडी दरबार, अंबाडा ते लाखनवाडी पायदळ पालखी सोहळा यंदाही भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. 7 जुलै रोजी अंबाडा येथून या पालखी सोहळ्याची सुरुवात झाली. अंबाडा, शिरजगाव कसबा व लाखनवाडी परिसरातील विविध ठिकाणी पूजन, महाआरती, अन्नदान व चहा-नाश्ता सेवा श्रद्धेने संपन्न झाली.पहिल्या दिवशी अंबाडा येथे सुरेश कोकाटे, मिनाताई कोकाटे आणि रामदास नागले यांच्या वतीने सकाळी, दुपारी व रात्री अन्नदान करण्यात आले. दुसऱ्या दिवशी पालखी शिरजगाव कसबा येथे पोहोचली. येथे सुदर्शन गवई, रतन तडस, पंकज कारिया, रवीनारायण जैस्वाल व प्रितेश गुर्जर यांच्या घरी दर्शन, महाआरती व अन्नदान करण्यात आले. रात्री संत गुणवंत महाराज सेवाश्रम व गजानन महाराज संस्थान येथे मुक्काम झाला. तिसऱ्या दिवशी रतन टाकरखेडे, मनोहर सुने, डिंगांबर सुने आणि भाऊराव सोनार यांच्या निवासस्थानी पूजन व अन्नदान करण्यात आले. रवींद्र पारधी, गणेश गुप्ता आणि बहिरम बाबा मंडळ यांच्या वतीने चहा-नाश्ता सेवा दिली गेली. संध्याकाळी पालखी करजगावमार्गे श्रीकृष्ण मंगल कार्यालय, लाखनवाडी येथे पोहोचली. येथे मुन्ना रहाटे, दिनेश बनसोड व गजानन गणोरकर यांच्या वतीने महाआरती व अन्नदान झाले. या सोहळ्याचे नियोजन श्री काशिनाथ विश्वकर्मा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. 10 जुलै रोजी संत गुणवंत बाबांच्या महासमाधीचे दर्शन, नगर प्रदक्षिणा, शोभायात्रा व महाप्रसादाने समारोप झाला. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारलेला होता.





# फक्त माझाच गोठा का?

## अशोक माहेकर यांचा ग्रामपंचायतीला सवाल



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.12 )**-परिसरातील वार्ड क्रमांक 6 मधील रहिवासी अशोक विठ्ठल माहेकर यांना त्यांच्या (8 बाय 15 फूट) जागेवरील गुराह्या गोठ्याबाबत ग्रामपंचायतीने हटविण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायतीकडून या जागेवर सौंदर्यीकरणाचे प्रकल्प राबविण्याचे कारण देण्यात आले आहे. मात्र, या कारवाईवर माहेकर यांनी आक्षेप घेत समान न्यायाची मागणी केली आहे.

अशोक माहेकर यांनी 'गटविकास अधिकारी' व ग्रामपंचायत सचिव यांच्याकडे दिलेल्या निवेदनात स्पष्ट नमूद केले की, फक्त माझ्या (8म15) जागेचे सौंदर्यीकरण करून काही फरक पडणार नाही. त्या जागेच्या सभोवतालही अनेक अतिक्रमणे आहेत. त्यावरही तशीच कारवाई झाली पाहिजे. ते पुढे म्हणाले की, जर सौंदर्यीकरणाचाच मुद्दा असेल, तर संपूर्ण अतिक्रमित जागेवर एकसमान नियम लावावेत, अन्यथा ही कारवाई अन्यायकारक व पक्षपाती ठरेल.

### प्रशासनाकडून स्पष्टता आवश्यक

माहेकर यांचा आरोप आहे की, केवळ निवडक जागांवरच कारवाई करून ग्रामपंचायत इतर अतिक्रमणांबाबत डोळेझाक करत आहे. त्यांनी त्यांच्या निवेदनात इतर अतिक्रमणांचा तपशीलवार उल्लेख करून त्या सर्वांवरही कारवाईची मागणी केली आहे.

### स्थानिकांमध्ये संतप्त भावना

या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामपंचायतीने संपूर्ण भागाचा आढावा घेऊन निष्पक्ष व पारदर्शक कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक म्हणजे 'जीवनदूत' !



## प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 12 )**-ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक हे केवळ प्रशिक्षण देणारे शिक्षक नसून, ते कुशल वाहनचालक घडवून अपघातांचे प्रमाण कमी करणारे 'जीवनदूत' आहेत, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा व शहरातील ड्रायव्हिंग स्कूल संचालकांसाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या वेळी प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विपिन लेदाडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवशंकर कातडे आणि सोहम हेमने उपस्थित होते.

प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना वाहनाचे तांत्रिक ज्ञान, रस्त्यावरील चिन्हांची माहिती, समृद्धी महामार्गासारख्या महामार्गांवर वाहन कसे चालवावे, वेग किती ठेवावा, घाट रस्ते व रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंगचे नियम याचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

'प्रत्येक प्रशिक्षकाने प्रशिक्षणाच्या वेळी ओळखपत्र बाळगावे. वाहन प्रशिक्षण काळात योग्य सूचना व मार्गदर्शन केल्यास अपघातांवर नियंत्रण मिळवता येईल,' असेही त्यांनी नमूद केले.कार्यशाळेत ड्रायव्हिंग स्कूल संचालकांच्या अडचणींवर चर्चा होऊन त्यांचे निराकरण करण्यात आले. हा उपक्रम प्रथमच राबविल्याबद्दल सर्व संचालकांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.

# शेतकऱ्यांसाठी लेखणी चालली नाही, तर तलवार चालवावी लागेल !



## बच्चू कडूंचा सरकारला इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/यवतमाळ ( दि.12 )**-राज्य सरकारच्या निष्क्रिय आणि शेतकरीविरोधी धोरणांवर ताशेरे ओढत अपक्ष आमदार बच्चू कडूंनी सरकारला थेट इशारा दिला आहे. 'सरकारची लेखणी जर शेतकऱ्यांच्या हितासाठी चालत नसेल, तर आम्हालाही तलवार चालवावी लागेल,' असे ठाम आणि संतप्त शब्दांत त्यांनी सांगितले.सध्या सुरू असलेल्या 'सातबारा कोरा कोरा' यात्रेला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, छावा संघटनेनेही आंदोलनाला ठाम पाठिंबा जाहीर केला आहे. ही यात्रा आता जनआंदोलनाच्या रूपात उभी राहत असून, शेतकरी, मेंढपाळ, मच्छीमार, शेतमजूर आणि वंचित घटक यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. सातबारा कोरा करणे, कर्जमाफी, हमीभाव या मुद्द्यांवर सरकारने फक्त आश्वासनं दिली, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र झालेली नाही. त्यामुळे 'लेखणीतून न्याय मिळत नसेल, तर रस्त्यावर उतरणं हाच पर्याय उरतो,' अशी भावना आंदोलनकर्त्यांमध्ये दिसून येते.

### शेतकरी जागृत असावा



बच्चू कडूंनी वरदळी गावात शेतकरी मांगीलाल जाधव यांच्याशी संवाद साधताना स्पष्ट केले की, आमची 'सातबारा कोरा यात्रा' ही शेतकऱ्यांमध्ये जागृतीसाठी आहे. शेतकरी जागृत झाला आणि एकजूट झाली, तर माझी गरजही भासणार नाही. सरकारला मग कर्जमाफी करावीच लागेल.

### 14 जुलैला रुमणे घेऊन अंबोडा गाठू!



चिरकुटा येथे झालेल्या सभेत बच्चू कडूंनी पुन्हा सरकारवर घणाघाती टीका केली. त्यांनी सांगितले की, कर्जमाफीच्या नावाखाली केवळ थट्टा चालली आहे. सातबाऱ्यावर आजही नोटीसा कायम आहेत. यानंतर शेतकऱ्यांनी निर्धार व्यक्त केला — आता लढाई निर्णायक आहे. 14 जुलैला आम्ही रुमणे, लाठ्या घेऊन अंबोडा गाठू. हे आमचे अस्त्र नाही, तर सरकारला जागं करण्याचं औषध आहे! बच्चू कडू म्हणाले, हा लढा कोणत्याही पक्षाचा नाही, तर मातीत जन्मलेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा आहे. आता उठाव करायची वेळ आली आहे!

### 14 जुलैला अंबोडा येथे निर्णायक सभा

यात्रेचा निर्णायक टप्पा 14 जुलै रोजी अंबोडा येथे होणाऱ्या भव्य जाहीर सभेने गाठणार आहे. यात्रेचा पाचवा दिवस संपताना शेकडो शेतकरी, महिलावर्ग, कामगार या लढ्यात सहभागी झाले आहेत. गावागावातून या यात्रेचे स्वागत होत असून, सातबारा कोरा झाला पाहिजे! या घोषणांनी वातावरण दणाणून गेलं आहे. ही सभा केवळ भाषणांची नाही, तर सरकारला जनतेच्या एकजुटीचा इशारा देणारी ठरणार आहे.

### फडणवीस साहेब, एकदा तरी बांधावर या!



यात्रेदरम्यान शेतात काम करणाऱ्या दोन महिलांशी संवाद साधताना बच्चू कडूंना शेतकऱ्यांची प्रत्यक्ष वेदना ऐकायला मिळाली. त्या म्हणाल्या, सावकाराकडून दरवर्षी कर्ज घ्यायचं, फेडायचं, आणि परत नव्या कर्जाच्या चक्रात अडकायचं... सुटका नाही! हे वास्तव ऐकून बच्चू कडू भावूक झाले. फडणवीस साहेब, एकदा तरी बांधावर या, शेतकऱ्यांची अवस्था स्वत: पाहा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# भक्तिमार्ग

## काळ चातुर्मासाचा, आरोग्य जपण्याचा

आषाढी एकादशीनंतर चार्तुमासाला प्रारंभ होतो. आषाढातली ही एकादशी देवशयनी मानली जाते. म्हणजे यानंतरचे पुढचे चार महिने देव निद्रिस्त अवस्थेत असतात. कार्तिक महिन्यातल्या प्रबोधिनी एकादशीपर्यंतचा काळ चातुर्मास मानला जातो. चार्तुमासाच्या काळात श्रीविष्णू क्षीरसागरी योगनिद्रा घेत असतो. त्यामुळे या काळात विष्णूची उपासना करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. हिंदू धर्मात या चातुर्मासाचं खूप महत्त्व आहे. या काळात कोणतीही शुभकार्यं केली जात नसली तरी व्रतवैकल्यं, सणवार यांची रेलचेल असते. या काळातली व्रतवैकल्यं, उपवास यांचं धार्मिक महत्त्व तर आहेच शिवाय वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही याचा विचार करण्यात आला आहे. हा दृष्टीकोन समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

आयुर्वेदात ऋतूमानानुसार आहाराचं महत्त्व सांगण्यात आलं आहे. चातुर्मासाचा काळ हा पावसाळ्याचा असतो. या काळात शरीरातला अग्नी मंदावतो. पचनशक्ती क्षीण झालेली असते. एकंदरित काय, तर या काळात वातावरणात फारसं चैतन्य नसतं. याची प्रचिती आपल्याला ठायी ठायी येत असते. पावसाळ्यात बाहेरचं वातावरणही काहीसं मंद आणि कुंद असतं. चार्तुमासात काही गोष्टी निषिद्ध मानण्यात आल्या आहेत. तामसी, सामिष आहार या काळात वर्ज्य करण्याबाबत सांगण्यात आलं आहे. या काळात एक वेळ भोजन घेण्यास सांगण्यात आलं आहे. पावसाळ्यात अग्नी मंदावत असल्याने पचनसंस्थेचं कार्य मंदगतीने चालतं. एक वेळ उपवास केल्याने पचनसंस्थेवर ताण येत नाही आणि आरोग्य उत्तम राहतं.



म्हणूनच या काळात साधा, सात्त्विक आहार घेतला जातो. एक वेळ लंघन केल्याने शरीरातले दोष कमी होतात. शरीर हलकं होतं. शरीराचा समतोल राखला जातो.

**धार्मिक परंपरा**

चातुर्मासात मौनव्रताचं महत्त्व आहे. तसंच या काळात निंदानालस्ती करण्यासही मनाई करण्यात आली आहे. एखाद्याबद्दल वाईट बोलणं, वाईट विचार करणं याला फाटा द्यायला हवा. फक्त चातुर्मासातच नाही तर आयुष्यभर या व्रताचं पालन करायला हवं. चातुर्मासाच्या निमित्ताने निदान याची सुरूवात तरी करायला हवी. आजच्या आधुनिक जमान्यात पूर्ण मौनव्रत पाळणं शक्य नसलं तरी मोजकं बोलणं, वायफळ बडबड न करणं, आयुष्याबाबत तक्रारी न करणं, कोणावर टिका, निंदा, टिंगल न करणं एवढं तरी पाळता येऊ शकतं. चार महिन्यांची ही सवय हळूहळू आयुष्यभरासाठी अंगी बाणवता येऊ शकते. चातुर्मासात मंदावलेल्या शक्तीमुळे बोलण्यावरही मर्यादा ठेवण्यास सांगण्यात आलं आहे. आषाढ मासानंतर श्रावणाची सुरूवात होते. श्रावण म्हणजे सण आणि व्रतवैकल्यांचा महिना. या काळातल्या व्रतांमुळे आरोग्य उत्तम राहतं तसंच मंगळागौर, नागपंचमीसारख्या परंपरा आणि सणांनिमित्त महिला एकत्र जमतात. निरस वातावरणात थोडे रंग भरण्याचा प्रयत्न करतात. चातुर्मासाकडे फक्त धार्मिक दृष्टीकोनातून न पाहता त्याचं वैज्ञानिक आणि सामाजिक महत्त्व जाणून घेतलं पाहिजे. असं झालं तरच आपण आपल्या धार्मिक परंपरांची आजच्या काळशी सांगड घालू शकू.

## आता वंदू गुरूजन

**कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरूची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरूचं स्थान अबाधित आहे. गुरू कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. नुकत्याच साजऱ्या झाललेल्या गुरू पौर्णिमेनिमित्त...**



प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूचं एक वेगळं स्थान असतं. गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने गुरूचं स्मरण करण्याची, त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्याची, त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळते. कुठलंही ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरूची आवश्यकता असते. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळवण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधनं आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले तरी आजही गुरूचं स्थान अबाधित आहे. गुरू कुठलंही ज्ञान सोप्या शब्दात आपल्यापर्यंत पोहोचवत असतो. ज्ञानावर त्याचे संस्कार झालेले असतात. एखाद्या विषयावर अभ्यास, मनन आणि चिंतन करुन त्याने तो विषय समजून घेतलेला असतो. असा स्वतःला समजलेला विषय दुसऱ्यापर्यंत पोहोचवताना तो आनंदी असतो. दुसऱ्याला ते ज्ञान देण्यामागे त्याची तळमळ असते. आपल्याला आकलन झालेल्या विषयावर विद्यार्थ्यानं आणखी काम करावं, त्यावर अधिक संशोधन व्हावं आणि ज्योतीनं ज्योत प्रज्वलित होत रहावी ही सच्च्या गुरूची मनोधारणा असते. म्हणून शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्यानं त्रिखंडात कीर्ती मिळवावी या उद्देशानं तो काम करतो. शिष्याच्या प्रगतीवर त्याच्या या सकारात्मक भावनांचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. म्हणूनच काळ बदलला तरी गुरूला पर्याय नाही.

आता गुरूगृही राहून तपसाधना करण्याचे दिवस नाहीत. घरचे लाडकोड अनुभवत शैशव घालवल्यानंतर किशोरवयात व्यवहाराचे कटू धडे घेण्यासाठी गुरूगृही जाण्याची आज आवश्यकता नाही. तिथल्या कडक शिस्तीत, समवयस्कांसमवेत विद्याभ्यास करण्याचं आज काहीच प्रयोजन नाही. निसर्गाच्या सानिध्यात राहून आयुष्याचा अर्थ जाणून घेत उत्तम गृहस्थ होण्यासाठी पार पाडावा लागणारा हा महत्त्वाचा टप्पा आज आपल्या जीवनशैलीपासून दूर गेला आहे. आता विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या, ज्ञानसंपन्न करणाऱ्या शिक्षण संस्था आहेत. पण त्यामुळे गुरू ही संकल्पना बदललेली नाही. एक नक्की की, आता परिस्थिती आमुलाग्र बदलली आहे. आजचं शिक्षण विद्यार्थी नव्हे तर परीक्षार्थी घडवत आहे. आता सगळ्याच घटांना एकसारख्या साच्यातून बाहेर काढलं जातंय. सर्वांना एकाच तागडीत तोलू पाहतंय. अर्थातच याचे तोटेही समोर दिसत आहेत. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. गुरूची रत्नपारखी नजर प्रत्येकातील विशेष गुण चाणाक्षपणे हेरत असे. प्रत्येक मातीचा कस लक्षात घेऊनच त्याला पूरक साच्यात घडवलं जात असे. म्हणूनच तयार होणाऱ्या प्रत्येकाचा आकार, रंग, रूप आणि अस्तित्व वेगळं असे. प्रत्येकाच्या अस्तित्वाला अर्थ देण्याचं काम असं विनासायास पार पडत असे. पण आता या संकल्पनेचं विकेंद्रीकरण झालं आहे. सकाळी शाळेत शिकायचं, दुपारी क्लासला जायचं, एखाद्या तिसऱ्याचं साहित्य अभ्यासाला पूरक म्हणूनच वापरायचं, गरज वाटल्यास घरातल्याचं सहाय्य घ्यायचं. म्हणजेच एक गुरू-एक शिष्य ही स्थितीच आता राहिलेली नाही.

**भक्ती विशेष**

मातापित्याचे संस्कार असतात तसेच गुरूंचे असतात. त्यांचं चारित्र्य, व्यासंग, वागणूक, व्यवहारज्ञान या सर्वांचा प्रभाव शिष्यावर पडतो. ही जाणूनबुजून नव्हे तर अप्रत्यक्षरित्या घडणारी क्रिया आहे. हे संस्कार त्या कोवळ्या वयात आदर्श निर्माण करत असतात. आयुष्यभर दीपस्तंभासारखी साथ देत असतात. पण काळाच्या प्रवाहात हा प्रघात मागे पडला आणि शिक्षणाचा बाजार मांडणारी एक व्यवहारी व्यवस्था अस्तित्वात आली. पण याचा अर्थ असा नव्हे, की आज गुरूपदी बसवावे असे लोकच नाहीत. सगळीकडे पसरलेली भेसळीची कीड इथेही पसरली असली तरी अनेक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्वं आपल्या आयुष्यात येतात. त्यातील काही लोक तर निरिच्छ भावनेनं विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. आज गुरूप्रती आदर कमी होतोय ही वस्तूस्थिती आहे. गुरूला एकेरी संबोधण्यापर्यंत ऱ्हास झालाय हे देखील वास्तव आहे. पैसा मिळवणं हे इप्सित समोर ठेवून विद्यादान करणाऱ्यांची संख्या वाढतीये हे नाकारण्यात अर्थ नाही. पण म्हणून सगळं संपलं असं नाही. कल्पना आणि वास्तव या दोन विरुद्ध बाबी असतात. त्या सांधणं हे कर्मकठीण काम. पण काहींना ही किमया साधते आणि बदलत्या प्रवाहातही स्वत्त्व टिकवून प्रवास सुरू ठेवला जातो. आजही असे अनेक आदर्श आहेत.

म्हणूनच आजही शाळेत असताना चिडके वाटायचे ते शिक्षक रस्त्यात भेटले की नकळत पायाला हात लावून नमस्कार केला जातो, जातीनं विचारपूस केली जाते. एखादी जुनी कविता वाचताना प्राध्यापकांनी वर्गात केलेलं रसग्रहण स्मरतं. तोंडी हिशेब करताना, पाढा चुकल्यावर शिक्षकांनी हातावर दिलेली छडी आठवते. वय आणि प्रगल्भता वाढताना शिक्षकांचा आठव अधिक गहिरा होत जातो. आजच्या पिढीलाही या अनुभूतीचा आनंद घेता यावा अशी इच्छा आहे. गुरूपौर्णिमा इव्हेंट होता कामा नये. किमती भेटवस्तू, हार-फुलांचे गुच्छ, महागडी ग्रिटिंग देऊन गुरूपौर्णिमेचा इव्हेंट साजरा होईल, पौर्णिमा नाही. ही व्यासपौर्णिमा साजरी करायची तर दोघांची मने विशुद्ध हवीत. मनात प्रेमभाव दाटून यायला हवा आणि हा वसा पुढे चालवण्याचा संकल्प सोडायला हवा. दिल्यानं वाढणारी ही एकमेव संपत्ती आहे. वाटल्यानं वृद्धिंगत होणारा हा एकमेव खजिना आहे. तो जपूया.



## अशी करावी आरती

भगवंताच्या पूजेनंतर आपण आरती करतो. आरती ही भगवंताची स्तुती असते. यामुळे देव प्रसन्न होतो, असं म्हटलं जातं. आरती करताना देवाला ओवाळलं जातं. आरतीचे विविध प्रकार आहेत. कर्पूर आरती, पंचारती याद्वारे परमेश्वराचं ध्यान केलं जातं. आरती करताना निरंजन लावलं जातं. तमिळमध्ये आरतीला ङ्गदीप आराधनईङ्ग असं म्हटलं जातं. आरती म्हणल्यानेच नाही तर यात सहभागी झाल्यानेही खूप पुण्य मिळतं. आरती करताना काही नियमांचं पालन करायला हवं. आरतीदरम्यान देवतेला तीन वेळा पुष्प अर्पण करायला हवं. आरती करताना झांजा, तबला, ढोल, वाजवले जातात.

आरती म्हणताना भक्ताच्या मनात विशेष भावना असली पाहिजे. आरती करताना देवाच्या ठायी पंचप्राण एकवटायला हवेत. मन परमेश्वराच्या चरणी लीन व्हायला हवं. मनात भक्तीभाव उमटायला हवा. आरती करताना लावलेल्या निरंजनाची ज्योत म्हणजे आपल्या आत्म्याच्या ज्योतीचं प्रतिक असतं. म्हणूनच आत्म्याची ज्योत परमेश्वराशी एकरूप व्हायला हवी. भक्ताने अंतर्मनाने साद घातली तर परमेश्वर प्रसन्न होतो, असं म्हणतात. आरती करताना आपण दिवा लावतो. हा दिवा विषम संख्येत असायला हवा. म्हणजे ३, ५ किंवा ७ दिव्यांनी देवाला ओवाळायला हवं. सर्वसाधारणपणे पाच दिव्यांनी देवाला ओवाळलं जातं. आरती करताना विविध माध्यमांचा वापर करता येतो. देवाला दिव्याने ओवाळता येतं. पाण्याने भरलेल्या शंखानेही आरती केली जाते. आरती करण्यासाठी पवित्र अशा रेशमी वस्त्राचा वापर केला जातो. आंबा आणि पिंपळाच्या पानांनीही आरती करता येते. तर साष्टांग म्हणजे मेंदू, हृदय, खांदे, हात आणि गुडघे अशा अवयवांनीही देवाची आरती करता येते. आरती हे मानवी देहातल्या पंचप्राणांचं प्रतिक मानली जाते. त्यामुळे येत्या सणासुदीच्या काळात किंवा दैनंदिन पुजेदरम्यान आरती करताना हे नियम लक्षात ठेवले तर अधिक लाभ होऊ शकतील.

**आराधना**

## संयमात सामर्थ्य दडलंय

संयम हा महत्त्वपूर्ण गुण आहे. या गुणामुळे आयुष्यातील खडतर प्रसंगांना तोंड देण्याची क्षमता येते. मौन हा संयमाचाच एक पैलू आहे. शब्द वाणीच्या रुपात प्रकट होतात तेव्हा मोठा प्रभाव सोडून जातात. हे शब्द चांगले असतात तेव्हा साहजिकच प्रभाव चांगला असतो. उलटपक्षी, शब्द कटू, अमंगल आणि उग्र असले की प्रभावही वाईट्च असतो. म्हणूनच आयुष्याचं अंतिम सत्य मृत्यू आहे अगदी त्याच प्रकारे वाणीचा शेवट मौन आहे. आपल्याकडे अक्षरांना ब्रह्म समजण्यात येतं. या शब्दब्रह्माचा उचित मान ठेवणं प्रत्येकाचं कर्तव्य आहे. वाणीचं माध्यम म्हणजे जीभ... वाणी मधूर असेल तर समोरच्या व्यक्तीपर्यंत माधुर्य पसरतं. मात्र जीभेद्वारे चुकीच्या शब्दांचा उच्चार झाला तर समोरची व्यक्ती कायमची दुरावते. हे सगळे शब्दांचे खेळ आहेत. मन आणि मस्तिष्कावर शब्दांचा थेट परिणाम होतो हे सत्य आधुनिक मानसशास्त्रानेही मान्य केलं आहे. एखादी व्यक्ती अपशब्द उच्चारत असेल तर समोरची व्यक्ती उत्तेजित होऊन त्याच अविर्भावात प्रत्युत्तर देते. समोरच्याची वाणी समजूतदार असेल तर प्रत्युत्तरही



तसंच येतं. म्हणूनच जगातल्या प्रत्येक धर्माने ऊर्जावान शब्दाचा संचय करण्याचं सूचित केलं आहे. कुठल्याही धर्माची प्रार्थना पाहिली तर त्यात मधूर, मंगल, ऊर्जावान शब्दच दिसतात. आपल्या मंत्रांमध्येही असेच शक्ती प्रदान करणारे, समन्वय साधणारे आणि संघटित होण्याची शिकवण देणारे शब्द आढळतात. हेच सामर्थ्य जगण्याला नवं बळ देतं. संगीतामध्ये शब्द आणि सुरांचा मेळ असल्यामुळे मनुष्यांवरच नव्हे तर वनस्पतींवरही त्याचा प्रभाव दिसतो. म्हणूनच शब्दांचा नेटका वापर शिकायला हवा. महावीरांनीदेखील सम्यक वाणीचं महत्त्व सांगितलं आहे. गुरुनानक सांगतात, सतत चांगलं बोला आणि ते शक्य नसेल तेव्हा मौन राखा. आपल्या भावना नियंत्रणापलिकडे जातात, शब्दांनी मन दुखवण्याची शक्यता समोर दिसते, वाणीने शत्रू निर्माण होतील हे स्पष्ट होतं तेव्हा काही काळासाठी मौन राखणं केव्हाही चांगलं. कारण हा ही तपसाधनेचा एक भाग आहे.

**स्वबोध**

## श्रीविष्णूची पावन तीर्थक्षेत्रे



उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर

चातुर्मास काळात श्रीविष्णूच्या आराधनेला महत्त्व आहे. यानिमित्ताने श्रीविष्णूच्या प्रसिद्ध मंदिरांची ही ओळख...

* चार धामांपैकी एक म्हणजे उत्तराखंडमधलं बद्रीनाथ मंदिर. अलकनंदा नदीच्या किनारी हे मंदिर वसलं आहे. या मंदिरात श्रीविष्णूची काळ्या पाषाणापासून घडवलेली मूर्ती आहे.
* पुरीचं जगन्नाथ मंदिरही चार धामांपैकी एक. या ठिकाणी श्रीकृष्ण, सुभद्रा आणि बलराम यांच्या मूर्ती आहेत. जगन्नाथाची रथयात्रा जगभरात प्रसिद्ध आहे.
* तिरुपतीचं बालाजी मंदिर हे श्रीविष्णूचं अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे. बालाजी मंदिर श्रीमंत देवस्थानांपैकी एक. इथे केस अर्पण करण्याची परंपरा आहे.
* तमिळनाडूतल्या कांचीपुरममध्ये उलागलंडा पेरूमल मंदिर आहे. हे स्थान विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे.
* केरळच्या थिरूअनंतपुरममध्ये पद्मनाभ स्वामींचं मंदिर वसलं आहे. हे जगातलं सर्वात श्रीमंत हिंदू मंदिर आहे.
* तमिळनाडूतल्या मदुराईमध्ये कोडालअझहगर मंदिर आहे. हे स्थानही विष्णूच्या १०८ दिव्यधामांपैकी एक आहे. कोडाल हे मदुराईचंच एक नाव आहे तर अझहगर म्हणजे सुंदर. म्हणूनच या मंदिराला कोडालअझहगर असं म्हटलं जातं.
* तमिळनाडूमधल्या कांचीपुरममध्ये श्री वरदराजा पेरूमला मंदिर आहे. विष्णूचे भक्त या स्थानाला अत्यंत पवित्र मानतात.
* गुवाहाटीमध्ये अस्वक्रंता मंदिर आहे. हे मंदिरही बरंच प्रसिद्ध आहे.
* तमिळनाडूतल्या श्रीरंगममध्ये श्रीरंगनाथस्वामी मंदिर आहे. या मंदिराची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आली आहे. इथे भाविकांची वर्दळ असते.

**तीर्थक्षेत्र**

## जन्माचं सोनं करा




चौऱ्याऐंशी लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो, असं हिंदू धर्म सांगतो. भूतलावरच्या सर्व प्राणीमात्रांमध्ये माणूस श्रेष्ठ मानला जातो. माणसाकडे बुद्धी आहे, जाणीवा आहेत. तो हसू शकतो, रडू शकतो, बोलू शकतो. सर्व प्राणीमात्रांमध्ये हे वरदान केवळ मनुष्यालाच मिळालं आहे. म्हणूनच मनुष्य जन्म मिळणं भाग्याचं मानलं जातं. या जन्माचं सोनं करायचं की मातेरं हे ज्याच्या त्याच्या हाती असतं. समर्थ रामदास स्वामी दासबोधातल्या पहिल्या दशकातल्या दहाव्या समासात नरदेह स्तवन करतात. यात ते नरदेहाचं महत्त्व विषद करतात. ते म्हणतात, धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो। जो जो किजे परमार्थालाहो। तों तों पावे सिद्धीतें।।१।। या नरदेहाचेनि लागवेगें। येक लागले भक्तीसंगें। येकीं परम वीतरागें। गिरिकंदरे सेविलीं।।२।।

याचा अर्थ असा की, हा नरदेह खरंच धन्य आहे. नरदेह प्राप्त झाल्यावर परमार्थ करता येतो. हीच याची अपूर्वता म्हणावी लागेल. जे परमार्थाला लागतात ते सिद्धीस जातात. नरदेह प्राप्त झाल्यानंतर काहीजण भक्तीमार्गाला लागतात. परमेश्वराची निस्सिम भक्ती करू लागतात. काहीजण वैराग्य पत्करतात. विरक्त होऊन ते डोंगरकपारीत राहू लागतात. नरदेह मिळाल्यानंतर विविध मार्गांनी देवाची भक्ती केली जाते. याबद्दल ते म्हणतात की, येक फिरती तीर्थाटणें। येक करिती पुरश्चरणें। येक अखंड नामस्मरणें। निष्ठावंत राहिले।।३।।

याचा अर्थ असा की नरदेह मिळाल्यानंतर कोणी तीर्थयात्रा करतात तर कोणी पुनश्चरण करतात. काहीजण स्वतःला अखंड नामस्मरणात गुंगवून टाकतात. नामस्मरणाची शक्ती ते जाणतात. आपल्या भगवंताप्रती ते निष्ठा आणि श्रद्धा राखतात. भगवंताचे नामस्मरण केल्यानंतर परलोकप्राप्ती होते, मोक्ष मिळतो पण हे सगळं नरदेहातच साध्य करता येतं. याबाबत समर्थ दासबोधात म्हणतात की, पशुदेहीं नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती। म्हणून नरदेहींच प्राप्ती परलोकाची ।।२१।। पशुदेही आत्म्याला गती मिळत नाही. यासाठी नरदेहच मिळावा लागतो. ही बाब सर्वश्रुत आहे. सर्वजण हे जाणतात. त्यामुळे नरदेह मिळाल्यानंतर परलोकप्राप्ती होऊ शकते. त्या दृष्टीने आपण प्रयत्न करायला हवेत. समासाच्या अखेरीस समर्थ म्हणतात, देह परमार्थी लाविले। तरिच याचे सार्थक जालें। नाहीं तरी हें वेर्थचि गेलें। नाना आघातें मृत्यूपंथे।।६१।।

याचा सरळ साधा अर्थ म्हणजे नरदेह परमार्थासाठी दिला तरच त्याचे सार्थक होते. नाही तर जन्म व्यर्थ जातो. त्याला काहीही अर्थ उरत नाही. परमार्थाकडे दुर्लक्ष केलं तर मनुष्य अनेक प्रकारच्या आघातांनी मृत्यूपंथाला लागतो. त्यामुळे मनुष्यदेहाचं सार्थक करून मोक्ष मिळवायचा असेल तर परमार्थ करायला हवा.

**दासबोधातून**

## राशी आणि रत्ने

मानवी आयुष्यावर रत्नांचा मोठा प्रभाव दिसून येतो, असं ज्योतिषशास्त्र मानतं. राशीनुसार रत्नं परिधान केल्यास व्यक्तीचं वर्तन आणि स्वभावामध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतात. म्हणूनच राशीनुसार रत्न धारण करावं आणि यशवंत व्हावं. आज याविषयी माहिती घेऊ. राशीचक्रातील पहिली रास म्हणजे मेष.

**मेष:** ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांनी हिरा घालावा. यामुळे उत्कर्ष होतो.

**वृषभ :** या राशीचा स्वामी शुक्र असून भाग्यरत्न पाचू हे आहे. या राशीच्या लोकांनी पाचू धारण केल्यास त्यांच्या विचारांमध्ये संतुलन बघायला मिळतं.

**मिथुन :** बुध राशीस्वामी असणाऱ्या मिथुन राशीच्या लोकांनी मोती धारण करावा. यामुळे आर्थिक स्थिती सुधारते त्याचबरोबर नातेसंबंधांमधील तणाव निवळतो.

**कर्क :** राशीचक्रातील या चौथ्या राशीच्या लोकांनी माणिक हे रत्न धारण करावं. हे रत्न या लोकांचा स्वभाव, जनसंपर्क आणि आर्थिक स्थितीवर प्रभाव दाखवतं.

**सिंह :** सिंह या राशीचा स्वामी सूर्य आहे. ही अग्नितत्त्वाची रास आहे. या राशीच्या लोकांना पेरीडॉट नामक रत्नाचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

**कन्या :** कन्या रास असणाऱ्या लोकांचं भाग्यरत्न नीलम आहे. चमकदार निळ्या रंगाचं हे रत्न या लोकांच्या आयुष्यात अत्यंत सकारात्मक बदल घडवून आणू शकतं.

**जाणून घ्या**

**तुळ :** तुळ राशीचा स्वामी शुक्र असून या राशीच्या लोकांना ओपल या रत्नाचा विशेष लाभ मिळतो.

**वृश्चिक :** जलतत्त्वाच्या या राशीचे लोक अतिशय संवेदनशील असतात. ते अधिक चिकित्सक असतात. या गुणांमध्ये संतुलन निर्माण करण्यासाठी वृश्चिक राशीच्या लोकांनी टोपाझ हे रत्न धारण करावं.



**धनु :** अग्नितत्त्वाची ही रास चिकित्सक स्वभावासाठी ओळखली जाते. या लोकांना वारंवार आरोग्याच्या तक्रारी जाणवतात. ही नकारात्मकता दूर करण्यासाठी लाजव्रत नावाचं रत्न उपयुक्त ठरतं.

**मकर :** मकर राशीच्या लोकांनी गार्नेट नामक लाभदायी रत्न धारण करावं. क्रिस्टल स्वरुपात असणारं हे रत्न शुभ फलदायी ठरतं.

**कुंभ :** या राशीचे लोक अग्नितत्त्वाने प्रभावित असतात. जीवनात संतुलन निर्माण करण्यासाठी त्यांनी एमेथिस्ट नामक रत्न धारण केल्यास चांगले परिणाम दिसून येतात.

**मीन :** भावनातिरेक हे स्वभाववैशिष्ट्य असणाऱ्या लोकांनी ॲक्वामरीन स्टोन नामक रत्न धारण करावं. हे रत्न आयुष्यातील नकारात्मकता घालवतं.

# विकास कामांचे योग्य नियोजन करा

## नागरी सुविधांसाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील नागरी सुविधा पुरविण्यासंदर्भात शनिवारी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यात राज्य शासनाकडून प्राप्त तीनशे कोटी रुपयांच्या निधीकरिता विविध विकास कामांचे नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या आयुक्त सभा कक्षात पार पडलेल्या बैठकीत आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, विकास ठाकरे, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, श्रीमती वैष्णवी बी., अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त मिलिंद मेश्राम, गणेश राठोड, परिवहन अधिकारी विनोद जाधव, अधीक्षक अभियंता श्रीमती लीना उपाध्ये, डॉ. श्वेता बॅनर्जी, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले कार्यकारी अभियंता श्रीमती अल्पना पाटणे, कमलेश चव्हाण यांच्यासह जिल्हा नियोजन अधिकारी तसेच झोनचे सहायक आयुक्त, उपअभियंता उपस्थित होते.

शहरातील नागरिकांना उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी विविध विकास कामांची माहिती दिली.

पालकमंत्री बावनकुळे यांनी नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासनाकडून प्राप्त तीनशे कोटीहून अधिक निधीचा योग्य उपयोग करता यावा म्हणून, विविध विकास कामांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

विधानसभा क्षेत्रानुसार विकास कामांकरिता संबंधित आमदारांकडून सूचना मागाव्यात, डीपीसी सेलच्या आमदार निधीतून होणाऱ्या विविध कामांकरिता झोन स्तरावर उपअभियंताची नेमणूक करावी अशा सूचना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. उपस्थित आमदारांनी आपआपल्या विधानसभा क्षेत्रातील समस्या मांडल्या.

# लता मंगेशकर यांना नागपुरात आणण्यामागे प्रकाश देशपांडे यांचे कुशल संघटन



## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

नागपुरात येण्यासाठी नकार दिल्यानंतर गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सत्काराचा कार्यक्रम नागपुरात आयोजित करण्याचे श्रेय ज्येष्ठ पत्रकार प्रकाश देशपांडे यांच्या कुशल संघटनाला जाते. ज्येष्ठ पत्रकार व कुशल संघटक प्रकाश देशपांडे यांच्या नावाने दिल्या जाणारा पुरस्कार ही भूषणावह गोष्ट आहे असे प्रतिपादन रस्ते, महामार्ग व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

औचित्य होते विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा आयोजित स्वर्गीय प्रकाश देशपांडे स्मृती कुशल संघटक पुरस्कार २०२५ या सोहळ्याचे. या सोहळ्याच्या आयोजन बाबुराव धनवटे सभागृह येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते अध्यक्ष म्हणून तर मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य राहुल पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुण्याचे उद्योजक संजय किर्लोस्कर, विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, बाळ कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कारमूर्ती डॉ. बळवंत भोयर व रवींद्र फडणवीस यांना शाल, श्रीफळ, २१ हजार रुपये रोख, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी नितीन गडकरी पुढे म्हणाले की मुंबईचे ५५ उड्डाणपूल व वरळी बांद्रे च्या प्रोजेक्टमध्ये प्रकाश देशपांडे यांचे सफल सहकार्य लाभले. शिक्षण क्षेत्रामध्ये राहून शिक्षक व विद्यार्थ्यांच्या भवितव्याची कास धरणारे माझे ४० वर्षापासूनचे मित्र रवींद्र फडणवीस व साहित्य क्षेत्रात आपली प्रतिभा सर्व दूर नेणारे बळवंत भोयर यांना मिळालेला स्वर्गीय प्रकाश देशपांडे स्मृती कुशल संघटक पुरस्कार २०२५ हा योग्यच आहे. यावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते म्हणाले की विदभार्चे सांस्कृतिक वारसदार असलेले गिरीश गांधी यांच्या नेतृत्वातून सामाजिक, सांस्कृतिक ,शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये त्यांनी नव्या नव्या प्रतिभावंतांना. कुशल नेतृत्वाला समोर आणून व पुरस्कार देऊन त्यांना प्रेरणा दिली आहे.

त्यांचे हे कार्य व कर्तृत्व खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. सत्काराला उत्तर देताना लेखक, संघटक, संपादक, समीक्षक, नाटककार व रसिक राजसाहित्य संस्थेचे अध्यक्ष असलेले बळवंत भोयर म्हणाले की माज्यातील कवी शालेय जीवनात मला मिळाला आणि माज्या साहित्य क्षेत्रातील लिहिली गेलेली पहिली कविता ही नव्या वगार्तील होती. शालेय जीवन व महाविद्यालयीन जीवनात मिळालेले गुरु व त्यांच्या मार्गदर्शनातून माज्यातील साहित्य प्रेम व कविता समृद्धीला आले.

कलेच्या क्षेत्रात राजाश्रय किंवा लोकाश्रय असणे आवश्यक आहे. यावेळी नागपूर जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सहकार्यवाहक रवींद्र फडणवीस आपल्या मनोगत म्हणाले की ४० वर्षांपूर्वी शिक्षण क्षेत्रात आता फार मोठा बदल झालेला आहे आणि सरकारचा शिक्षण क्षेत्रात होणारा हस्तक्षेप व वाढलेला भ्रष्टाचार यामुळे शिक्षण क्षेत्राला गालबोट लागलेले आहेत आणि याचे उदाहरण नागपुरात दिसत आहे.

माज्या या क्षेत्रात कार्य करत असताना मी माज्यातला संघटक आणि कार्यकर्ता जागृत ठेवलेला आहे आणि यातूनच गडचिरोलीतील ९० मुलींना मी शाळेच्या प्रवाहात आणलेले आहे व बाल चळवळीतून त्यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक भवितव्यासोबत त्यांचे खेळातही भविष्य घडविलेले आहेत. यावेळी गिरीश गांधी आपल्या प्रस्तावनेत म्हणाले की मानवाला मिळालेली प्रतिभा ही देवाची देण आहे मानवाने आपली प्रतिभा व ज्ञान समाजासाठी उपयोगी आणले पाहिजे.

कार्यक्रमाला मंचावर रूपाली मोरे ,प्रगती पाटील, अतुल दुर्गकर व साहित्य क्षेत्रातील मान्यवर सभागृहात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस तर आभार प्रदर्शन निलेश खांडेकर यांनी केलेण

# हल्दीरामच्या मालकास ९.५५ कोटी रुपयांचा गंडा

## गुंतवणुकीच्या बदल्यात ७६% शेअर्स देण्याचे आमिष

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
हल्दीराम कंपनीचे मालक कमल अग्रवाल यांना गुंतवणुकीच्या बदल्यात रॉयल ड्रायफ्रूट प्रा. लि. कंपनीचे ७६ टक्के शेअर्स देण्याचे आश्वासन देऊन ९ कोटी ५५ लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

मुंबईतील चार ठकांनी मिळून हल्दीराम समूहाची फसवणूक केली आहे. या प्रकरणात पती, पत्नी, मुलगा आणि एक भागीदार अशा चौघांचा समावेश आहे. आता आरोपी लालानी दाम्पत्य आणि त्यांचा मुलगा तिघेही पसार झाले आहेत.

नुकतेच नागपूर आणि नवी दिल्ली येथील अग्रवाल कुटुंबीयांच्या दोन हल्दीराम कंपन्यांचे विलीनीकरण करण्यात आले. या नव्या हल्दीराम कंपनीचे मूल्यांकन तब्बल ८४ हजार कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहे. यानंतर हल्दीराम ग्रुपची उपकंपनी ओम इंडस्ट्रीज लिमिटेडने रॉयल ड्राय फ्रूट प्रायव्हेट लिमिटेड मधील शेअर्स विकत घेतले.

लालानी दांपत्याने रॉयल ड्राय फ्रूट प्रायव्हेट लिमिटेड मधील ७६ टक्के शेअर्स देण्याचे आश्वासन दिले होते.

समीर अब्दुल हुसेन लालानी, त्यांची पत्नी हिना लालानी, मुलगा आलिशान लालानी आणि प्रकाश भोसले यांनी विविध सबबी सांगून कमल अग्रवाल यांना संभाषणात गुंतवले.

त्यानंतर हल्दीराम कंपनीसोबत पुन्हा करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सप्टेंबर २०२३ पर्यंत कमल अग्रवाल यांच्या कंपनीने एकूण ९ कोटी ३८ लाख ५९ हजार रुपयांची गुंतवणूक केली होती.

यानंतरही कमल अग्रवाल यांना ना नफा मिळाला ना शेअर्स, त्यामुळे त्यांना संशय आला. हल्दीराम कंपनीने आरोपींच्या कंपनीची चौकशी केली असता, बनावट कागदपत्रांच्या आधारे वार्षिक उलाढाल, नफा आदी गोष्टी अतिशयोक्तिपूर्ण दाखवण्यात आल्याचे उघड झाले. इथूनच वाद सुरू झाला. पोलिसांत तक्रार दाखल झाल्यानंतर लालानी दांपत्य आणि त्यांचा मुलगा फरार झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# विनयभंगाची तक्रार दाखल होताच संशयिताची विष पिऊन आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १२ :
१५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या ४० वर्षीय व्यक्तीविरोधात आर्णी ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आले होते. दरम्यान दुसऱ्याच दिवशी त्या व्यक्तीने माळेगाव जंगलात विष प्राशन करून आत्महत्या केली. मिथुन मधुकर भेंडे असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे.

आर्णी शहरातील अल्पवयीन मुलगी घरात एकटीच असल्याचा फायदा घेत मिथून भेंडे याने तिचा विनयभंग केला होता. पिडीत मुलीने आर्णी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मिथून भेंडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, वरुड (तुका) या रस्त्याच्या मार्गावरील जंगलात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती वरुड येथील पोलिस पाटील नितीन खोडे यांना एका गुराख्याकडून मिळाली.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस पाटील यांनी तातडीने या संदर्भात पारवा ठाणेदारांना कळविले. त्यानंतर पारवा पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा करून मृतकाची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला. यावेळी मृतक हा मिथून भेंडे असल्याची ओळख नातेवाईकांकडून पोलिसांना कळाली. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# जलाभिषेक करून देणार बच्चू कडूंच्या यात्रेला पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
अपंग बांधवांना ६००० रुपये संजय गांधी पेन्शन अनुदान वाढ करण्यासाठी तसेच शेतकरी यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यासाठी अपंगांचे नेते बच्चू कडू यांची अमरावती ते यवतमाळ पदयात्रा सुरू आहे.

या सर्वसामान्य जनतेच्या न्याय मागण्या करिता पाठिंबा म्हणून दिव्यांची संघटना असलेल्या विराट मल्टीपर्पज फाउंडेशनच्यावतिने अध्यक्ष मनोज नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली भगतसिंग चौक स्थित शिवमंदिर येथे १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता जलाभिषेक करण्यात येणार आहे.

दरम्यान, या मागण्यांचे निवेदन तहसीलदार खामगाव यांच्यामार्फत मुख्यमंत्री आणि राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पाठविण्यात येणार आहे. सर्व दिव्यांग, निराधार व शेतकरी बांधवांनी या जलाभिषेक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन विराट मल्टीपर्पज फाउंडेशन संस्था तसेच प्रहार शहराध्यक्ष शत्रुघन इंगळे मधुकर पाटील वसंत चिखलकर नीरज सुराणा विनोद पवार जळगाव जामोद येथील चंद्रकांत शिंदे अभिजीत डोंगरे, नांदुरा प्रकाश चोपडे, सुरेश खानाचंदानी, शेगाव संतोष निंबाळकर, दुर्गा ददगळ, संग्रामपूर दिलीप लऊळ यांनी केले आहे

# आठ आरोपींविरूद्ध दोषारोपपत्र दाखल

**: शालार्थ आयडी घोटाळा :**
**विजय वडेट्टीवारांचे पोलीस आयुक्तांना पत्र**

शालार्थ आयडी घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार नीलेश वाघमारे अटकेपासून अजूनही दूर आहे. नागपूर पोलिस वाघमारेला अजूनही अटक करू शकले नाही, याबद्दल नाराजी व्यक्त करणारे पत्र विजय वडेट्टीवार यांनी पोलिस आयुक्त रविंद्र सिंगल यांना लिहिले आहे.

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

राज्यभरात गाजत असलेल्या नागपूर जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्यातील आठ आरोपींविरूद्ध सदर पोलिसांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोट क्र. ६ यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. इतर आरोपीही लवकरच गजाआड होतील असे सदर पोलिसांनी सांगितले.

शिक्षक घोटाळ्यातील आरोपींविरूद्ध सदर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणांत आतापर्यंत यवतमाळ, भंडारा, गोंदीया व नागपूर जिल्ह्यातील पराग नानाजी पुडके (वय ३३), उल्हास कडूजी नरळ (वय ५४), निलेश शंकरराव मेश्राम (वय ५२), नागपूर, संजय शंकरराव बोधाडकर (वय ५३), वडगाव रोड यवतमाळ, सुरज पुंजाराम नाईक, (वय ४०) नागपूर, महेंद्र भाऊराव महेशकर (वय ४३), नागपूर, राजू केवडा मेश्राम (वय ५९), गोंदिया, चरण नारायण चेटूले (वय ६३), भंडारा यांचा समावेश आहे.

या गुन्ह्यात भंडारा जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी (सध्या नेमणूक शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय गडचिरोली) कार्यालयातील अधीक्षक रवींद्र पंजाबराव सलामे (वय ४५), नेहरूनगर, भोजापूर, जिल्हा भंडारा, यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.

या गुन्ह्यातील आरोपी पराग नानाजी पुडके याला कधीही कोणत्याही शाळेमध्ये सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्ती नव्हती. असे असताना नानाजी पुडके विद्यालयात सलामे यांच्या बनावट नियुक्ती आदेशाने मुख्यध्यापक म्हणून रूजू झाला. एस. के. बी. शाळा, यादव नगर नागपूर या शाळेच्या लेटरहेडवर बनावट अनुभव प्रमाणपत्र गुन्ह्यातील अटक आरोपी महेंद्र म्हैसकर सोबत कट रचून जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात प्रस्ताव सादर केला होता.

# समृद्धी महामार्गावरुन अवैध वाळू वाहतूक

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :
समृद्धी महामार्गावरुन अवैधरित्या वाळुची वाहतूक करणाऱ्या वाळुतस्कांविरोधात महसूल विभागाने धडक कारवाई करीत तीन टिप्परवर फौजदारी कारवाई केली आहे.

तीनही वाहनांना ४ लाख ३२ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ही कारवाई लोणार महसूल विभाग व मेहकर पोलिसांनी केली.

# बॅडमिंटन खेळताना वीजेचा धक्का

## १० वीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

सोसायटीच्या आवारात मित्रांसोबत बॅडमिंटन खेळणाऱ्या एका दहावीच्या विद्यार्थ्यांचा वीजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात मृत विद्यार्थी खिडकीत अडकलेला शटल काढण्याच्या प्रयत्नांनात तिथेच लटकलेला दिसून येत आहे.

१५ वर्षीय आकाश संतोष साहू असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो सायंकाळी ७ च्या सुमारास आपल्या मित्रांसमवेत नायगावच्या बीच कॉम्प्लेक्सच्या आवारात बॅडमिंटन खेळत होता. खेळताना त्यांचा शटलकॉक पहिल्या मजल्यावरील खिडकीत अडकला.

तो काढण्यासाठी आकाश मित्राच्या मदतीने वर चढला असता त्याला खिडकीच्या सज्जावर ठेवण्यात आलेल्या एसीचा करंट लागला. शॉक एवढा जबरदस्त होता की, आकाशचा जागीच मृत्यू झाला. तो एसीला चिकटल्याचे पाहून त्याच्या मित्राने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. पण त्यालाही वीजेचा झटका बसला. काठीच्या मदतीने दूर ढकलेले असता आकाश वरून खाली जमिनीवर पडला.

# शनिशिंगणापूर देवस्थान घोटाळा ५०० कोटींच्या घरात



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
शनिशिंगणापूर देवस्थानातील घोटाळा थोडाथोडका नसून ५०० कोटी रुपयांच्या घरात असल्याचे समजते . देवस्थानच्या चौकशीत धमार्दाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी क्लिन चिट दिली होती.

शनिशिंगणापूर देवस्थानामध्ये कर्मचारी, पुजारी आणि विश्‍वस्तांनी मिळून ऑनलाइन पद्धतीने पूजा करण्यासाठी भक्तांचे बनावट ॲप, क्युआर कोडवर पैसे घेऊन आणि २४४७ कर्मचाऱ्यांचा बोगस कर्मचारी घोटाळा करून तब्बल ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप नेवाशाचे आमदार विठ्ठल लंघे आणि आमदार सुरेश धस यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधानसभेत केला होता.

शनिशिंगणापूर देवस्थानात काही कर्मचारी आणि पुजाऱ्यांनी देवस्थानाच्या अधिकृत ॲपऐवजी बनावट ॲप तयार केले आहे. त्यांनी क्यूआर कोड आणि बनावट पावती पुस्तक तयार केले आहे. एका-एका ॲपचे दोन ते तीन लाखांपेक्षा जास्त भाविक सदस्य आहेत. प्रत्येक भाविकाकडून त्यांच्या नावाने पूजा करण्यासाठी १८०० रुपये घेतले जातात. इतर पूजेच्या साहित्यासाठी वेगळे शुल्क घेतले जाते. बोगस कर्मचारी भरती केली असून कर्मचाऱ्यांच्या नावाचा पगार आणि बनावट ॲप, क्यूआर कोडवर जमा होणारे पैसे इतर बँक खात्यांमध्ये घेतले जात आहेत. बोगस २४४७ कर्मचाऱ्यांना नियमितपणे देवस्थानाच्या अधिकृत अकाउंटवरून वेतन दिले जात असल्याचे सांगण्यात आले.

देणगी स्वीकारण्यासाठी ८ आणि तेल विक्रीसाठी ४ अशा १२ खिडक्या आहेत. या ठिकाणी २ कर्मचारी काम करताना आढळतात. मात्र, त्या ठिकाणी ३५२ कर्मचारी दाखवण्यात आले. देवस्थानाच्या एकूण १३ गाड्या आहेत. त्यावर १६३ कर्मचारी दाखवण्यात आले. प्रत्यक्षात १३ कर्मचारी आढळले.

वृक्षसंवर्धन विभागात ८३ कर्मचारी दाखवले. मात्र, कार्यरत कुणीही नाही. एकूण ३५ एकर जमीन आहे. त्यामध्ये ६५ कर्मचारी दाखवले. पाणीपुरवठा विभागात ६९ कर्मचारी दाखवले. गौशाळा विभागात ८२ कर्मचारी दाखवले. त्यातील २६ कर्मचारी रात्री १ वाजेपासून काम करतात, असे दाखवले.

२५०-२७५ कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून चालणाऱ्या देवस्थानामध्ये २४४७ कर्मचाऱ्यांची बोगस भरती केली. देवस्थानाच्या रुग्णालयात ३२७ कर्मचारी कार्यरत असल्याचे दाखवले. तपासणी केल्यावर रुग्णालयात एकही नव्हता.

१५ खाटा, ८० वैद्यकीय आणि २०० अकुशल कर्मचारी दाखवले. प्रत्यक्षात ४ डॉक्टर आणि ९ कर्मचारी हजर होते. रुग्णालयात कोणतीही बाग आढळली नाही. मात्र, बागेच्या देखरेखीसाठी ८० कर्मचारी दाखवले. एकुण ३२७ ज्यांना काही कामच नाही, ज्यांचे काही अस्तित्व नाही, असेही कर्मचारी दाखवले गेले. भक्त निवासात १०९ खोल्या आहेत. त्यासाठी २०० कर्मचारी कार्यरत असल्याचे दाखवले.

# कुत्र्यांसाठी शेल्टर होम... माणसं मात्र पाण्यात!

**विदर्भ डायरी**
**■ मनोज बागडे**



रविवार ६ जुलैच्या पहाटेपासून बुधवार ९ जुलैच्या रात्रीपर्यंत धो धो बरसलेल्या पावसाने नागपूर शहराची पार दैना केली .

या मुसळधार पावसाची शहरातील श्रीमंताच्या वस्त्यांना फारशी झळ पोहचली नसली तरी, झोपडपट्ट्या आणि गरीबांच्या वस्त्यांना मोठा फटका बसला. कित्येक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

नागपूर शहरातील अनेक रस्त्यांना नाल्याचे स्वरूप आले होते. सुदैवाने रस्त्यावर बोट चालवावी लागली नाही. बहुतेक सर्व उड्डाणपुलाखाली तीन ते चार फूट पाणी साचले होते.

साहजिकच ही नैसर्गिक आपत्ती होती. त्यामुळे कुणालाही दोष देता येणार नाही. परंतु, नागपूर शहराच्या सर्वांगिण विकासाचा दावा करणारी महानगर पालिका आणि येथील लोकप्रतिनिधींना जबाबदारी झटकून मोकळे होता येणार नाही. महानगरपालिकेवर सद्धया प्रशासक राज आहे. आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि त्यांची टीम शहराचा विकास आणि येथील समस्या निकाली काढण्यासाठी मेहनत घेत आहेत, याबाबत दूमत नाही. परंतु, पावसाळा आला की दरवर्षी हे संकट उभे ठाकते. यावर कायमस्वरूपी उपाययोजना का शोधल्या जात नाही?

नागपूर शहरात मोकाट कुत्र्यांचा मोठाच हैदोस आहे. पायी जाणारे किंवा दुचाकीस्वारांच्या मागे हे कुत्रे धावून पडतात. कारवर धावण्यापर्यंत त्यांचे धाडस वाढले आहे. चावा घेवून अनेकांना जखमी केल्याच्याही घटना यापूर्वी अनेकदा घडल्या. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करायचा म्हणून, मनपाने शहराच्या बाहेर त्यांच्यासाठी आलिशान शेल्टर होम बांधणे सुरू केले आहे.

काही दिवसांपूर्वी मनपाने या डॉग शेल्टर होमचे संभावित रेखाचित्र माध्यमांना पाठविले होते. ते पाहून हे एखादे थ्री स्टार सेंटर असल्याचे भासते. अर्थात, यावर कोट्यवधीचा खर्चही केला जात आहे. सगळे मोकाट कुत्रे या सेंटरमध्ये टाकले गेले की ते शहरात येणार नाही आणि नागरिकांना भय उरणार नाही. संकल्पना चांगली आहे, पण, कुत्रे महत्वाचे की शहरात राहणारी माणसं? मनपाला कर देणारी कुटुंब? याचाही विचार व्हायला हवा.

नागपूर शहरात अशा अनेक वस्त्या आहेत, जिथे पावसाळ्याच्या दिवसात नरकयातना भोगाव्या लागतात. सखल भागातील शेकडो घरांमध्ये पाणी साचते. धान्य, कपडेलत्ते, फर्निचर आणि अन्य साहित्य खराब होते. आर्थिक नुकसानीची झळ सोसणाऱ्या येथील कुटुंबांना दुसरीकडे आश्रय घ्यावा लागतो. वर्षानुवर्षे ही स्थिती असताना मनपाने यावर काय उपाययोजना केल्या?

गेल्या आठवड्यातील या संकटानंतर विरोधकांना आयतेच कोलित मिळाले. काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे म्हणतात, नागपूर शहराच्या विकासावर १ लाख कोटींचा खर्च केला गेला? तरीही ही गंभीर स्थिती आहे.

हे खरे असेल तर, या सर्व कामांची प्रामाणिक चौकशी होणे गरजेचे आहे. एखाद्या कामाचे भूमिपूजन आणि पाहणी करतानाचे फोटो टाकून स्वतःचा उदोउदो करून घेणारे अधिकारी आणि नेत्यांनी कुत्र्यांचे लाड पुरवताना या शहरात माणसं राहतात, याचाही विचार जरूर करावा.

**मारकुंड्या आमदार**

विदर्भावर सातत्याने अन्याय होतो, मागासलेपणाकडे दुर्लक्ष केले जाते, पुरेसा निधी दिला जात नाही म्हणून सातत्याने ओरड केली जाते. विदर्भात शेतकरी आत्महत्या ही गंभीर समस्या आहे, सिंचनाचा अनुशेष कायम आहे. विदर्भातील किती आमदार अधिवेशनात यावर बोलतात? या समस्यांवर सभागृहात तुटून पडण्याचे सोडून येथील आमदारांचे भलतेच उद्योग सुरू असतात.

विदर्भाच्या बुलढाणा जिल्ह्यातील शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड याने तर भलताच प्रताप केला. निकृष्ट जेवण दिले म्हणून त्यांनी आमदार निवास कॅन्टीनच्या व्यवस्थापकाला मारहाण केली. वरून आपल्याला या कृत्याचा पश्चाताप नसल्याचे हे महाशय सांगतात.

चांगले जेवण मिळाले नाही म्हणून आमदार कर्मचारी, व्यवस्थापकांना मारत असेल तर, त्यांच्या मतदारसंघातील फुटलेले रस्ते, जीर्ण होवून कोसळत असलेले पुल, शाळांच्या गळक्या इमारती.. यासाठी सामान्य नागरीक आणि मतदारांनी या आमदारांसोबत कोणते आणि कसे वर्तन करावे?

आमदार आणि मंत्र्यांविरूद्ध बोलणाऱ्यांविरूद्ध अनेकदा सभागृहात हक्कभंग ठराव आणला जातो, शिक्षेची तरतूद केली जाते. मग, मारहाण करणाऱ्या अशा आमदारांवर केवळ अदखलपात्र गुन्हा नोंदवून मोकळे सोडणे, कायद्याची थट्टा नव्हे काय? राहुल गांधींची जीभ झाटणाऱ्यास ११ लाखाचे बक्षिस जाहीर करणाऱ्या या आमदाराने सुरक्षेतील पोलिसाकडून स्वतःची गाडी धुवून घेतली होती. याशिवाय, त्यांचे अनेक प्रताप यापूर्वी उघड झाले आहेत. या मारकुंड्या आमदाराच्या कृत्याने त्याची तर छी.. थू.. झालीच, विदर्भालाही बट्टा लागला.

■ ■ ■